सत्यमेव जयते

महाराष्ट्र विधानमंडळ
सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१५ - २०१६)
(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील '' महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित '' यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.५ व ४.६ आणि सन २०१०-२०११ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील '' महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित'' यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ आणि सन २०१३-२०१४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१२-२०१३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील '' हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित'' यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१० यावरील समितीचा

सातवा अहवाल

(दिनांक १२ एप्रिल २०१६ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर केला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.

सार्वजनिक उपक्रम समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील '' महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित '' यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.५ व ४.६ आणि सन २०१०-२०११ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील '' महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित'' यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ आणि सन २०१३-२०१४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१२-२०१३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील '' हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित'' यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१० यावरील समितीचा

सातवा अहवाल

एचबी ३०७३—१

सार्वजनिक उपक्रम समिती
(सन २०१५-२०१६)

समिती प्रमुख

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

सदस्य

* (२) डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. भिमराव धोंडे, वि.स.स.
(४) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(५) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(६) ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.
(७) श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.
(८) श्री. अमित साटम, वि.स.स.
(९) श्री. राजन साळवी, वि.स.स.
(१०) श्री. हर्षवर्धन जाधव, वि.स.स.
(११) श्री. सुनिल राऊत, वि.स.स.
(१२) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.
(१३) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(१४) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.
(१५) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१६) श्री. पंकज भुजबळ, वि.स.स.
(१७) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स
(१८) श्री. मकरंद जाधव-पाटील, वि.स.स
(१९) श्री. हितेंद्र ठाकूर, वि.स.स.
(२०) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(२१) ॲड. अनिल परब, वि.प.स.
(२२) श्री. किरण पावसकर, वि.प.स.
(२३) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

(२४) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.
(२५) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,
श्री. राजेश तारवी, उप सचिव,
श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव,
श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती),
श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

* ॲड. राज पुरोहित, वि.स.स. यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर डॉ. अशोक उईके, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक १६ डिसेंबर, २०१५ रोजीपासून नियुक्ती करण्यात आली.

अनुक्रमणिका

अनु-क्रमांक (१)	तपशील (२)		पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना		
एक.	**" महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २००८-२००९)**	..	१
	(१) अवाजवी फायदा (परिच्छेद क्रमांक ४.५)	. .	१
	(२) टाळण्याजोगा खर्च (परिच्छेद क्रमांक ४.६)	. .	७
दोन.	**" महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २०१०-२०११)**	. .	१२
	(३) टाळता येण्याजोगा खर्च (परिच्छेद क्रमांक ३.१)	.. ..	१२
तीन.	**" महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २०१०-२०११)**	..	१७
	(४) टाळता येण्याजोगे महसुलाचे नुकसान (परिच्छेद क्रमांक ३.१३)	.. ..	१७
चार.	**" महाराष्ट्र लघुद्योग विकास महामंडळ मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २०१३-२०१४)**	..	२६
	(५) महसुलाचे नुकसान (परिच्छेद क्रमांक ४.१)	.. ..	२६
पाच.	**" हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित " (लेखा परीक्षा अहवाल २०१२-२०१३)**	..	३१
	(६) लेख्यांचे प्रमाणिकरण विलंबाने केल्यामुळे महसुलाचे नुकसान (परिच्छेद क्रमांक ४.१०)	..	३१
सहा	**बैठकीचे परिशिष्ट**	..	३९

प्रस्तावना

मी, सार्वजनिक उपक्रम समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून महाराष्ट्र शासनाच्या सन २००८-२००९ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्र. ४.५ व ४.६ आणि सन २०१०-२०११ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्रमांक ३.१ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१०-२०११ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक तीन मधील परिच्छेद क्र. ३.१३ आणि सन २०१३-२०१४ च्या (वाणिज्यिक) अहवालातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्रमांक ४.१ तसेच महाराष्ट्र शासनाच्या सन २०१२-२०१३ च्या हिशेबावरील भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या (वाणिज्यिक) अहवालातील " हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित " यांच्या कामकाजासंबंधातील प्रकरण क्रमांक चार मधील परिच्छेद क्र. ४.१० यावरील समितीचा सातवा अहवाल (तेरावी महाराष्ट्र विधानसभा) सादर करीत आहे.

" महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभागाचे अपर मुख्य सचिव, डॉ. पी. एस. मीना, तसेच " महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचे " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. तानाजी सत्रे, व श्री. विश्वास पाटील यांची समितीने दिनांक १६ जून २०१५ व १६ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर उद्योग विभागाचे प्रधान सचिव, श्री. अपूर्व चंद्रा, तसेच " महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. शिवाजी दौंड, यांची समितीने दिनांक ३ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

" हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित " यांच्याकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनावर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अपर मुख्य सचिव, श्रीमती मेधा गाडगीळ, तसेच " हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादितचे " कार्यकारी संचालक, श्रीमती सीमा व्यास व महाव्यवस्थापक श्री. सुभाष शंकरवार यांची समितीने दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष नोंदवून घेतली.

श्रीमती संगीता चौरे, प्रधान महालेखाकार (लेखा III), श्री. रविकिरण उबाळे, उप महालेखाकार तसेच श्री. एस. व्ही. खेडकर, वरिष्ठ लेखा अधिकारी (वाणिज्यिक लेखा परिक्षक) यांनी निमंत्रणानुसार समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला केलेल्या मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

तसेच सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभागाचे अपर मुख्य सचिव, डॉ. पी. एस. मीना, तसेच " महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचे " उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. तानाजी सत्रे, व श्री. विश्वास पाटील तसेच उद्योग विभागाचे प्रधान सचिव, श्री. अपूर्व चंद्रा, तसेच " महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितचे " व्यवस्थापकीय संचालक, श्री. शिवाजी दौंड व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अपर मुख्य सचिव, श्रीमती मेधा गाडगीळ, तसेच " हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादितचे " कार्यकारी संचालक, श्रीमती सीमा व्यास व महाव्यवस्थापक श्री. सुभाष शंकरवार यांनी समितीला दिलेल्या संपूर्ण सहकार्याबद्दल समिती त्यांचे आभार मानते.

समितीने मंगळवार दिनांक ५ एप्रिल २०१६ रोजी झालेल्या बैठकीत या अहवालावर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक ५ एप्रिल २०१६.

डॉ. सुनिल देशमुख
समिती प्रमुख,
सार्वजनिक उपक्रम समिती.

" महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित "

(सन- २००८-२००९)

एक. अवाजवी फायदा :—

(कंपनीने मिहान प्रकल्प नागपूर मधील जमीन कमी दराने विकून सत्यम कॉम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेडला रुपये २०.२१ कोटींचा अवाजवी फायदा करून दिला.)

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-०९ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.५ मध्ये " **अवाजवी फायदा** " या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, नागपूर येथे बहूआयामी आंतरराष्ट्रीय प्रवासी व मालवाहतुकीचे केंद्र (मिहान) विकसित करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितची स्थापना करण्यात आली होती (२६ ऑगस्ट २००२) भारत सरकारने मिहान प्रकल्पांतर्गत बहुउत्पादीय विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) स्थापन करण्याकरिता तत्वतः मान्यता दिली होती (ऑगस्ट, २००५) कंपनीच्या संचालक मंडळाने मिहान प्रकल्पांतर्गत विकावयाच्या जमिनीच्या संदर्भात मूल्य धोरण (प्राईसिंग पॉलिसी) ठरविले होते (मे, २००५) संचालक मंडळाने जमीन विक्रीकरिता निश्चित केलेले दर खालीलप्रमाणे होते. दोन हेक्टरपर्यंत रुपये ६५ लाख प्रती हेक्टर * दोन हेक्टरपेक्षा अधिक व दहा हेक्टरपर्यंत रुपये ६४ लाख प्रती हेक्टर, दहा हेक्टरपेक्षा अधिक व २० हेक्टरपर्यंत रुपये ६२ लाख प्रती हेक्टर, २० हेक्टरपेक्षा अधिक पण २५ हेक्टर पेक्षा कमी नाही व त्याहून अधिक रुपये ६० लाख प्रती हेक्टर (प्रती एकर दर रुपये २४.२८ लाख) जमिनीची विक्री प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्वावर कंपनीने निश्चित केलेल्या दराने करण्याचे पण कंपनीने ठरविले होते.

हैद्राबाद स्थित सत्यम कॉम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेडने (एससीएसएल) मिहान विभागात माहिती तंत्रज्ञानविषयक कार्यक्रमाकरिता रुपये १६ लाख प्रती एकर या दराने १०० एकर (४०.४७ हेक्टर एवढी) जमिनीचे वाटप करण्याची विनंती (नोव्हेंबर, २००५) केली. कंपनीच्या संचालक मंडळाने, ज्याला याबाबतीत अधिकार होते, एससीएसएल रु. २४.२८ लाख प्रती एकर या पूर्वीच निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दराने म्हणजे रु. १८ लाख प्रती एकर ** या दराने १०० एकर जमीन " प्रथम मागणी प्रस्ताव " (अर्ली बर्ड ऑफर) मानून वाटपास मान्यता दिली (५ डिसेंबर २००५) कंपनीने एससीएसएल बरोबर १०० एकर जमिनीचे वाटप करण्याविषयी सामंजस्य करार (डिसेंबर, २००५) मध्ये केला.

लेखापरीक्षणात खालील गोष्टी आढळून आल्या :

- कंपनीने लवकर मागणी करणाऱ्यांकरिता उत्तेजन (अर्ली बर्ड इन्सेंटिव्ह) म्हणून सवलतीच्या दरात जमीन वाटण्याविषयी कुठलेही धोरण आखले नव्हते. कंपनीच्या जमीन विक्री धोरणांत पारदर्शकता व औचित्य या तत्वांचे पालन करण्यात येते याची खातरजमा करण्यासाठी अशा प्रकारचे धोरण आखणे आवश्यक आहे.

*** एक हेक्टर = २.४७१ एकर, एक एकर = ०.४०५ हेक्टर.**

**** रुपये ४४.४८ लाख प्रति हेक्टरच्या समकक्ष.**

- कंपनीच्या संचालक मंडळाने मिहान प्रकल्पामध्ये माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित सुविधांचा विकास करण्यासाठी शापूर्जी पालनजी आणि कंपनी लिमिटेडला (एसपीसीएल) १०० एकर जमीन रु. २६.३० लाख प्रती एकर देण्याचे मान्य केले होते (५ डिसेंबर २००५) अशी वस्तुस्थिती असतांना एससीएसएलचा " प्रथम मागणीदार " - अर्ली बर्ड - म्हणून कमी दराने जमीन विक्रीस मान्यता देणे समर्थनीय नव्हते. कंपनीने स्वतःच ठरविलेल्या रु. २४.२८ लाख*** प्रती एकर दरा ऐवजी एससीएसएलला रु. १८ लाख प्रती एकर भावाने जमीन विकल्यामुळे कंपनीला रु. ६.२८ कोटीचा महसूल कमी मिळाला व पर्यायाने एससीएसएलला तेवढ्या रकमेचा अवाजवी फायदा झाला.

- नंतर एससीएसएलच्या विनंतीनुसार व जागेच्या सर्वेक्षणाच्या आधारे कंपनीने संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय सामंजस्य समझोत्यामध्ये ३ मार्च २००७ रोजी दुरुस्ती करून रुपये २२.३५ लाख **** प्रती एकर दराने आणखीन २८.०६ एकर अतिरिक्त जमिनीचे वाटप केले. मे. रिटॉक्स बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांनी उत्पादन प्रक्रियेशी संबंधित (नॉन प्रोसेसिंग झोन) नसलेल्या जमिनीकरिता २००५-०६ मध्ये बाजारभावाने म्हणजे रुपये ७२ लाख प्रती एकर दर देऊ केला होता. अतिरिक्त जमिनीचे (मार्च, २००७) प्रचलित बाजारभावापेक्षा कमी दराने सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय वाटप करणे अयोग्य होते. सवलतीच्या दराने भूखंड वाटपामुळे कंपनीला रुपये १३.९६ कोटीच्या ***** महसुलाचे नुकसान झाले.

अशा तऱ्हेने कंपनीच्या सवलतीच्या दराने जमिनीचे वाटप करण्याच्या निर्णयामुळे एससीएसएलला रु २०.२१ कोटीच्या (रुपये ६.२८ कोटी + रुपये १३.९३ कोटी) अवाजवी फायदा करून दिला गेला व पर्यायाने स्वतःच्या तेवढ्या महसुलाचे नुकसान झाले होते.

व्यवस्थापनाने असे उत्तर दिले (मे, २००९) की, डिसेंबर, २००४ मध्ये जाहिर सूचना देऊन स्वारस्य अभिव्यक्ती (एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) मागविल्या होत्या पण त्याला चांगला व पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी पुढे पण असे सांगितले की, एससीएसएल आणि एसपीसीएल ना एकाच दिवशी जमिनीचे वाटप केले नव्हते. व्यवस्थापनाने दिलेले उत्तर वस्तूस्थितीला धरून नसल्याचे खालील गोष्टींवरून दिसून येते :

- भारत सरकारकडून नागपूर येथे बहू उत्पादीय विशेष आर्थिक विभाग (मल्टीप्रोडक्ट सेझ) स्थापन करण्याची मान्यता ऑगस्ट, २००५ मध्ये मिळाली होती पण जमीन वाटपासंबंधात जाहिरात डिसेंबर, २००४ मध्येच करण्यात आली होती. सबब विस्तृत जाहिरात (वाईड पब्लिसीटी) केल्याचे कंपनीचे म्हणणे बरोबर नाही.

***** रुपये ६० लाख प्रति हेक्टरच्या समकक्ष.**

****** रुपये ५५.२३ लाख प्रति हेक्टरच्या समकक्ष.**

******* २८.०६ एकर × (रुपये ७२ लाख- रुपये २२.३५ लाख प्रति एकर).**

- जरी एससीएसएल व एसपीसीएल यांना वेगवेगळ्या तारखांना जमिनीचे वाटप करण्यात आले होते तरी या दोन्ही प्रस्तावांना संचालक मंडळाने ५ डिसेंबर २००५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली होती. सवलतीच्या दराने जमीन वाटप करण्याचे धोरण नसतांना संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय एससीएसएलला अतिरिक्त जमिनीचे वाटप समर्थनीय नव्हते.

शिफारस करण्यात येते की :

- जमिनीचे वाटप संचालक मंडळाची मान्यता घेऊनच करण्यात यावे.
- कंपनीने सवलतीच्या दराने जमिनीचे वाटप करण्याच्या संदर्भात असे सुस्पष्ट धोरण तयार करावे की ज्यामध्ये सवलतीच्या दराचा बाजार भावाशी मेळ असेल.
- कुणालाही अवाजवी लाभ होऊ नये याकरिता जमीन वाटपात पारदर्शकता व औचित्य राखले जाईल याची खातरजमा करावी.

वरील प्रकरण शासनाला कळविण्यात आले होते (एप्रिल, २००९) पण त्यांच्याकडून उत्तर मिळाले नाही (डिसेंबर, २००९).

१.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, याद्वारे हे सूचित करण्यात येते की, कंपनीने लवकर मागणी करण्याकरिता उत्तेजन म्हणून (अर्ली बर्ड इंसेटिव्ह) सवलतीच्या दरात जमीन वाटण्याविषयी धोरण आखले नव्हते हे लेखापरिक्षेचे विधान अयोग्य आहे. यथाशक्य, लवकर मागणी करण्याकरिता उत्तेजन (अर्ली बर्ड इंसेटिव्ह) हे केवळ आणि केवळ एकदाच मिळू शकते आणि पुनरावृत्तीय नाही, त्यामुळे लवकर मागणी करणाऱ्याकरिता उत्तेजन (अर्ली बर्ड इंसेटिव्ह) असे धोरण असू शकत नाही. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने माहिती तंत्रज्ञान कंपन्यांना नागपूर येथील मिहान विशेष आर्थिक क्षेत्रात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने इकोनॉमिक टाईम्स मध्ये दिनांक २ डिसेंबर २००४ रोजी दिलेल्या सार्वजनिक सूचनेद्वारे स्वारस्य अभिव्यक्ती मागविली होती (प्रत जोडली आहे) परंतु त्याला पुरेसा व चांगला प्रतिसाद नव्हता. प्रचंड प्रयत्नांती आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या पातळीवरून वैयक्तिक पाठपुरावा केल्यानंतर हैद्राबादस्थित सत्यम कम्प्युटर्स सर्व्हिसेस मर्यादित (एससीएसएल) यांनी मिहान -विशेष आर्थिक क्षेत्रात येण्याचे कबूल केले आणि प्रति एकर १८ लाख किंमत देऊ केली जी संचालक मंडळाने मंजूर केली होती. या अनुषंगाने, याकडे लक्षवेधू इच्छितो की, दिनांक १८ नोव्हेंबर २००५ च्या पत्रान्वये (प्रत जोडली आहे) त्यांनी निर्देशित केले की आंधप्रदेश सरकारने विशाखापट्टणम येथे कॅम्पस विकसित करण्यासाठी डोंगराकडे तोंड करून असलेला सागरतीरावरील ५० एकर भूखंड रुपये १० लक्ष प्रति एकर या दराने देऊ केला होता. एकदा मे. सीसीएसएल ने या प्रकल्पात प्रवेश केल्यानंतर काही इतर माहिती तंत्रज्ञान कंपन्यांनी विचारणा करण्यास प्रारंभ केला आणि नंतर किंमती वेळोवेळी पुनर्लोकित केल्या गेल्या कारण त्यानंतर आकर्षित मागणी येऊ लागली.

महालेखाकारांनी सूचित केल्याप्रमाणे मे. सीएसएल आणि मे. शापूर्जी पालनजी आणि कं.मर्यादित (सीसीएसएल) मुंबई यांना एकाच दिवशी वाटणी केली आणि त्यांना आकारण्यात आलेला दर भिन्न होता हे म्हणणे योग्य ठरणार नाही. याकडे निर्देश करण्यात येत आहे की मे. सीसीएसएल ची विनंती दिनांक २० जानेवारी २००५ ला लवकर मागणी करण्यासाठी सवलतीन्वये (अर्ली बर्ड ऑफर) मिळाली होती आणि मे. शापूर्जी पालनजी कंपनी मर्यादितची विनंती दिनांक २८ सप्टेंबर २००५ ला मिळाली होती आणि म्हणून हे म्हणणे योग्य ठरणार नाही की, प्रस्ताव एकाच दिवशी प्राप्त झाला. योगायोगाने, दोन्ही प्रस्ताव संचालक मंडळाच्या एकाच सभेत ठेवले गेले, जी ५ डिसेंबर २००५ ला घेतली गेली होती. लेखापरिक्षेचे परिक्षण त्यामुळे स्वीकृत करण्यायोग्य नाही.

सन २००५-०६ या वर्षात उल्लेखिलेला बाजार भाव, प्रति एकर ७२ लक्ष हा वि.आ. क्षेत्राबाहेरील जमिनीसाठी आहे आणि वि.आ. क्षेत्रातील नाही आणि त्यामुळे लेखापरिक्षेतील वितर्क की कंपनीने सन २००५-०६ सुमारास प्रति एकर रुपये ७२ लक्ष बाजारभाव स्वीकारला होता हे योग्य आहे परंतु तो वि. आ. क्षेत्राबाहेरील जागेसाठी होता आणि वि.आ. क्षेत्राबाहेरील किंमत, वि.आ. क्षेत्रातील जमिनीच्या किंमतीशी तुलनायोग्य नाही. वि.आ. क्षेत्रातील जमिनीवर अनेक निर्बंध आहेत आणि निर्यात व माहिती तंत्रज्ञान व तत्सम कार्यासाठी जी निर्यातीकरिता आहेत केवळ त्यासाठीच वापरली जाऊ शकते आणि वि.आ. क्षेत्राबाहेरील जमीन राहणे, व्यापार, मनोरंजन, साठवणूक इ. करीता वापरली जाऊ शकते. वि.आ. क्षेत्रातील जमिनीचे ठरविलेले दर वि.आ. क्षेत्राबाहेरील दरांशी तुलना योग्य नाहीत, जे स्पर्धात्मक बोलीने वाटले जातात. सदरच्या वस्तूस्थितीमध्ये लेखापरिक्षेने वि.आ. क्षेत्रातील जमिनीच्या किंमतीची वि.आ. क्षेत्राबाहेरील जमिनीशी तुलना केली आहे, आणि म्हणून ती स्वीकृती योग्य नाही मे. एससीएसएल ला अतिरिक्त २८.०६ एकर भूखंड वाटप केले होते हे योग्य आहे. ही २८.०६ एकरची जमीन ही अशी जमीन नव्हती जी कुठल्याही व्यापारी कामासाठी विक्री वा विकसित करता आली असती, पण ही जमीन होती आणि मे. सीसीएसएल ला दिलेल्या जमिनीतील भूभागातीलच पाणथळ जमीन होती आणि सीसीएसएल व्यतिरिक्त इतर कोणाला विकता आली नसती.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने विकलेल्या जमिनीसाठी अगोदर आकारल्यापेक्षा अधिक दर आकारला आहे. जमीन संपूर्णतः वापरा अयोग्य होती. ही जमीन मे. सीसीएसएस बांधकामाकरिता वापरु शकत नाही. ज्यायोगे ही जमीन वस्तुस्थितीमध्ये विकण्यायोग्य नव्हती आणि त्याचवेळेस महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला विक्री अयोग्य जमिनीसाठी महसूल मिळाला, संचालक मंडळाची वेगळी संमती घेणे आवश्यक वाटले नाही. कारण अंदाजे १०० एकर जमीन वाटपासाठी संचालक मंडळाची परवानगी अगोदरच घेण्यात आली होती.

सामंजस्य कराराला जोडलेल्या जमिनीच्या निर्देशित नकाशावरुन हे अतिरिक्त पाहिले जाऊ शकते की, मे. एससीएसएल ला १३३.५७ एकर जमिनीचे वाटप प्रस्तावित होते आणि त्यामुळे नंतर वाटप करण्यात आलेली जमीन ही सदर जमिनीचा अंतर्गत भाग होती.

योगायोगाने, याकडे निर्देश केला जातो की, महालेखाकार (वाणिज्य) यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या सन २००६-२००७ या वर्षासाठी केलेल्या औचित्य हिशोब तपासणीत लेखा परीक्षा प्रश्न उपस्थित केला होता आणि निर्देशित केले होते की, मंजूर किंमतीपेक्षा कमी किंमतीत जमीन विकल्याने ६.८७ कोटी रुपयांचा तोटा झाला आहे. मविविकंपनीने आपल्या पत्र क्र मविविकं / वित्त/ ४१६७, दिनांक २६ मार्च २००८ अन्वेय सविस्तर स्पष्टीकरण दिले होते. त्या पत्राची प्रत येथे जोडली आहे. सदर लेखाप्रश्न (ऑडिट पॅरा) महालेखाकार - महाराष्ट्र यांच्या चौकशी खाली होता आणि अंतिमतः महालेखाकारांच्या पत्र क्र. CA-II/ChangeV/AG/CA/CAWII/MAD C/IR २००५.०७/E ४३८०, दिनांक ४ ऑगस्ट २००८ अन्वये समाप्त म्हणून मानला गेला होता. सदर पत्राची प्रत येथे जोडली आहे.

हे पुन्हा सांगण्यात येत आहे की, सदर लेखाप्रश्न (ऑडिट पॅरा) महालेखाकाराद्वारे अगोदरच उपस्थित केला गेला होता आणि लेखाकारांच्या विविध पातळ्यावर अधिकाऱ्याद्वारे चर्चिला गेला होता आणि सविस्तर स्पष्टीकरणानंतर प्रश्न वगळण्यात आला.

१.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, मे.सत्यम कंपनी व मे.शापुर्जी पालनजी कंपनी या दोन कंपन्यांच्या अर्जामध्ये केवळ ८ दिवसांचा फरक आहे. अशा परिस्थितीत मे.सत्यम कंपनीला Early bird incentive देण्याचा खुलासा दुबळा आहे. परंतु, त्यावेळेची परिस्थिती विचारात घेता, खुलासा मान्य करण्यात येत आहे.

मे.सत्यम कंपनीस त्यानंतर वाटप केलेली २८.०६ एकर अतिरिक्त जमीन, प्राधिकाराशिवाय म्हणजेच संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय प्रदान केलेली आहे, तसेच सत्यम कंपनीसोबत निष्पादित केलेल्या सामंजस्य करारात परस्पर केलेली सुधारणा / दुरुस्ती प्राधिकाराशिवाय म्हणजेच संचालक मंडळाच्या मान्यतेशिवाय प्रदान केलेली आहे. सत्यम कंपनीस प्रदान केलली २८.०६ एकर अतिरिक्त जमीन विक्रीयोग्य नसल्याबाबत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने केलेला दावा मान्य करण्यासारखा नाही कारण, आर्थिक बाबतीत जाणीवपूर्वक निर्णय घेणारी खाजगी क्षेत्रातील कोणतीही कंपनी विक्रीस अयोग्य जमीन विकत घेऊन रुपये ६.२७ कोटीचा तोटा सहन करणार नाही.

उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पहाता, २८.०६ एकर अतिरिक्त जमिनीचे वाटप समर्थनिय नसून या प्रकरणी वित्तीय अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करणे योग्य राहील असे मत आहे.

१.४ तद्नंतर याप्रकरणी समितीला सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक १६

फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ४.५ मध्ये " अवाजवी फायदा "** या आक्षेपासंदर्भात महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने नागपूर येथील मिहान प्रकल्पामधील जमीन सत्यम कम्प्युटर सर्व्हिसेस लि. ला कमी दराने विकून रु. २०.२१ कोटींचा अवाजवी फायदा करून दिला याबाबत महामंडळाने खुलासा करावा असे सांगितले, यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदासंदर्भात सकारात्मक निर्णय घेण्यात आला असून महामंडळाने मे.टेकमहिंद्रा या कंपनीला विचारणा केली असता टेकमहिंद्रा या कंपनीने २८ एकर जमिनीचा भाग महामंडळाला देण्यास संमती दर्शविली, त्यामुळे रु. १३.९३ कोटी किमतीची जमीन परत प्राप्त झाल्यामुळे विभागीय सचिवांनी भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक आणि मा. समितीस हा परिच्छेद वगळावा अशी विनंती केली यावर समितीने सुरुवातीला जमीन घेण्यासाठी कोणी तयारी न दर्शविल्यामुळे महामंडळाचा जमीन वाटप करण्याचा हेतू चांगला होता असा अभिप्राय मांडला, यानंतर तसेच सदरहू जमीन यापूर्वी कोणाला दिली होती का, शापूर्जी पालनजी प्रकरणी सवलत का दिली नाही असा प्रश्न केला.

यावर विभागीय सचिवांनी भविष्यात जी व्यक्ति येईल त्याला जमीन देण्यात येईल सध्या ही जमीन विमानतळ कंपनीच्या मालकीची आहे. सदरहू जमीन वाटप मे.सत्यम कम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेडला देण्यात आली होती. मे.सत्यम कम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेडने सदरहू जमीन मे. टेकमहिंद्रा कंपनीला दिली होती. मे. टेकमहिंद्रा कंपनीकडून सदरहू जमीन परत घेण्यात आली आहे आणि याप्रकरणी first come first serve या तत्त्वानुसार मे.सत्यम कम्प्युटर सर्व्हिसेस लि. यांना जमीन देण्यात आली होती असा समितीसमोर खुलासा केला.

१.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ४.५ अवाजवी फायदा (कंपनीने मिहान प्रकल्प नागपूर मधील जमीन कमी दराने विकून सत्यम कम्प्युटर सर्व्हिसेस लिमिटेडला रुपये २०.२१ कोटींचा अवाजवी फायदा करून दिला)** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, कमीत कमी तीन निविदाकार पुढे येत नाही तोपर्यंत निविदा प्रक्रियेमध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने पुढील प्रक्रिया करू शकत नाही म्हणून नव्याने निविदा काढणे आवश्यक होते. **यासंदर्भात अशी शिफारस करण्यात येते की, महामंडळाच्या बोर्ड मिटींगमध्ये जेव्हा प्रस्ताव मांडण्यात येतो तेव्हा बोर्डाचा निर्णय व्यवस्थापकीय संचालकांच्या सूचनेनुसार घेण्यात येतो. तरी यासंदर्भात महामंडळामार्फत पारदर्शक व वाणिज्यिक तत्त्वानुसारच धोरण प्रक्रिया अवलंबविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

दोन - टाळण्याजोगा खर्च :—

[मनाई असलेल्या क्षेत्रात स्वतःच्या उपयोगाकरिता कोळशावर आधारित ऊर्जा निर्मिती संयंत्र (कॅप्टीव पॉवर प्लान्ट) उभारण्याच्या निर्णयामुळे रुपये २९.६२ लाखाचा टाळण्याजोगा खर्च झाला].

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-०९ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.६ मध्ये **" टाळण्याजोगा खर्च "** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, कंपनी नागपूर येथे आंतरराष्ट्रीय बहुउद्देशीय प्रवासी व मालसामान विमानतळ (मिहान) उभारत आहे. मिहान प्रकल्पातील विविध घटकांना दर्जेदार व अव्याहत विद्युत पुरवठा करण्यासाठी कंपनीने मुख्य पारेषण व वितरण वाहिन्यांच्या प्रणालीसह स्वतःच्या वापराकरिता ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्याचे (सी.पी.पी.) ठरविले कंपनीच्या संचालक मंडळाने सप्टेंबर २००४ मध्ये सी.पी.पी. (१०० मव) उभारणीय मान्यता दिली. सी.पी.पी. ३३ वर्षे मुदतीकरता बांधा, वापरा व हस्तांतरित करा (बीओटी) या तत्त्वावर उभारावयाचा होता.

प्रस्तावित धावपट्टीपासून ४.६ किलोमीटर अंतरावर असलेल्या दहेगांव या ठिकाणी कोळशावर आधारित सी.पी.पी. उभारण्याकरिता ना हरकत दाखला देण्याची कंपनीने भारतीय विमानतळ प्राधिकरणास (एएआय) विनंती केली (मार्च,२००५) भारतीय विमानतळ प्राधिकरणाने प्रस्तावित विमानतळापासून आठ किलोमीटर अंतरात फक्त तेल व विजेवर आधारित विद्युत निर्मिती संयंत्रास परवानगी असल्याने (ऑईल / इलेक्ट्रीक फायर्ड फर्नेस) तशा प्रकारचे संयंत्र उभारण्यास ना हरकत परवाना दिला (ऑगस्ट,२००५) परंतु एएआयकडून ना हरकत मिळण्यापूर्वीच स्पर्धात्मक बोलींद्वारा (कॉम्पीटीटीव्ह बिडींग) अर्नेस्ट ॲण्ड यंग प्रा.लि. (ई.वाय.पी.) यांना रुपये ३९.५० लाख व्यावसायिक शुल्क (फिक्सड प्रोफेशनल फी) निश्चित करून सल्लागार म्हणून नेमले होते (जुलै,२००५) सल्लागारांस सोपवलेल्या कामात सी.पी.पी. करिता सविस्तर व्यवसाय आराखडा (बिझनेस प्लॅन) बनविणे, प्रकल्पाची आर्थिक उभारणी (प्रोजेक्ट फायनानशियल स्ट्रकचरिंग), प्रकल्पाची व्यवहार्यता (व्हायाबिलीटी) व वीजदरांची रचना (टॅरीफ सेटींग), बोली प्रक्रिया व्यवस्थापन (बीड प्रोसेस मॅनेजमेंट) आणि व्यवसायिक रचनेची आखणी (फायनालायझेशन ऑफ कमर्शियल स्ट्रक्चर) या बाबींचा समावेश होता. एएआयने फक्त तेल किंवा विद्युत विजेवर चालणाऱ्या सी.पी.पी. उभारणीस मान्यता दिली असून देखील कंपनीच्या वतीने ईवायपीने मे,२००६ मध्ये कोळशावर चालणाऱ्या सीपीपी उभारणीसाठी बोली दस्तऐवज (बीड डॉक्युमेंटस) तयार केले व निविदा आमंत्रित केल्या. कोळशावर चालणाऱ्या सी.पी.पी करिता निविदा बोलविल्यानंतर कंपनीने एएआयला अगोदर दिलेल्या ना हरकत दाखल्यावर पुन्हा विचार करण्याची व कोळशावर चालणारी भट्टी उभारण्यास परवानगी देण्याची विनंती केली. परंतु कंपनीची विनंती एएआयने असे कारण सांगून फेटाळली (ऑगस्ट,२००६) प्रस्तावित विमानतळाच्या आठ कि.मी. अंतरात फक्त तेल किंवा विजेवर चालणारी भट्टी वापरण्याचे बंधन आहे व कंपनीने तशा प्रकारचे वचन पण (अंडरटेकींग) प्रपत्र १ बी मध्ये दिले होते. परिणामी कंपनीला नियोजित

विमानतळापासून आठ कि.मी. पेक्षा अधिक अंतरावर नवीन ठिकाणी नियोजित सी.पी.पी. स्थानांतरित करावा लागला जेणेकरून त्यामध्ये कोळशावर आधारित भट्टीचा उपयोग करता येईल इवायपीने पूर्वीचे स्थान लक्षात घेऊन केलेल्या ७५ टक्के कामापोटी कंपनीने त्यांना रु. २९.६२ लाख दिले. कंपनीने वाटाघाटी द्वारा इवायपी यांना रु. ३९.५० लाख सल्लागार शुल्क देण्याचे मान्य करून त्यांना निविदा कागदपत्रे बनविणे, करारनामे, अपेक्षित दराची गणना (कॅलक्यूलेशन ऑफ एक्सपेक्टेड प्राईस), प्राप्त बोलीचे मूल्यांकन (ईव्हॉलूएशन ऑफ बीड) सीपीपीचे बदललेले ठिकाण लक्षात घेऊन नव्याने पुन्हा एकदा करण्यास सांगितले.

अशा प्रकारे अयोग्य ठिकाणी कोळशावर आधारित सीपीपी उभारण्यास मनाई असल्याचे ज्ञात असून सुध्दा तशा प्रकारच्या कामास सुरूवात करणे सदोष व्यवस्थापकीय नियोजनाचे द्योतक आहे. ज्यामुळे इवायपीला देण्यात आलेल्या रु. २९.६२ लाखांचा टाळता येण्याजोगा खर्च झाला.

व्यवस्थापनाने उत्तरात सांगितले की, (डिसेंबर २००८ - ऑगस्ट २००९) कोळशावर आधारित वीज निर्मिती संयंत्र उभारण्याकरिता विविध शासकीय परवानग्या मिळविण्यासाठी त्यांनी बऱ्याच आधी कारवाई सुरू केली होती, परंतु असाधारण परिस्थिती उद्‌भवल्यामुळे त्यांना सीपीपीचे पूर्वनियोजित स्थान बदलणे भाग पडल्यामुळे केलेला खर्च अपरिहार्य होता. व्यवस्थापनाने असेपण सांगितले की, एकदा संचालक मंडळाने प्रकल्पास मान्यता दिल्यानंतर अन्य अनुषंगिक सोपस्कार (प्रोसीजरल फॉरमॅलीटीज) पूर्ण होण्याची वाट पहाण्यात काही हशील नव्हते. कंपनीच्या उत्तरावरुन कंपनीस प्रस्तावित विमानतळापासून आठ किलो मीटरच्या आत कोळशावर आधारित भट्टी वापरण्यास प्रतिबंधात्मक अटीची (मॅन्डेटरी कंडीशन) जाणीव असल्याचे स्पष्ट होते. एएआयकडून आवश्यक परवानगी मिळालेली नसताना सीपीपी उभारण्याच्या कामास प्रारंभ करण्यासाठी केलेला युक्तीवाद/समर्थन स्वीकाहार्य नाही.

म्हणून शिफारस करण्यात येते की, अपूर्ण नियोजनामुळे झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच आवश्यक त्या सर्व परवानग्या मिळाल्यानंतरच प्रकल्पाची जागा निवडून काम हाती घ्यावे.

याप्रकरणी सरकारला कळविण्यात आले होते (जुलै २००९) परंतू त्यांचे उत्तर मिळाले नव्हते (डिसेंबर २००९).

२.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, मिहान प्रकल्पात " स्वतःच्या वापरासाठी ऊर्जा निर्मिती प्रकल्प " (सी.पी.पी) उभारण्यासाठी, जो औद्योगिक, पायाभूत सुविधा आणि दर्जात्मक विद्युत पुरवठ्याच्या प्राथमिक गरजांपैकी एक आहे. जी विशेष आर्थिक क्षेत्राच्या मुख्यत्वे करून स्पर्धात्मक वातावरणात अतिशय गरजेची आहे, त्यास कंपनीच्या संचालक मंडळाने ६ सप्टेंबर,२००४ ला मान्यता दिली. बांधा वापरा व हस्तांतरीत करा (बीओटी) तत्त्वावर उभारण्याच्या या प्रकल्पासाठी अर्नेस्ट ॲण्ड यंग या सल्लागार कंपनीला नियुक्त करण्यात आले. व्यवसाय आराखडा (बिझनेस प्लॅन) बनवणे, विविध करार करणे, बोली प्रक्रिया

व्यवस्थापन यासाठी त्यांची नियुक्ती रु. ३९.५० लाख व्यावसायिक शुल्क निश्चित करून ११ जुलै, २००५ ला झाली होती. याद्वारे असेही सूचित करण्यात येत आहे की, प्रस्तावित सी. पी.पी. हा मिहानमधील दहेगांव, या ठिकाणी निश्चित झाले होते. जे ठिकाण प्रस्तावित दुसऱ्या धावपट्टीपासून ४.६ कि.मी वर आहे. कोळशावर आधारित सी.पी.पी. प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाची संमती प्राप्त झाली होती.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने संयंत्राच्या चिमणीची उंची ३५९ मी. पेक्षा जास्त असू नये या अटी वर ऑगस्ट,२००५ ला या प्रकल्पाला ना हरकत प्रमाणपत्र दिले होते. या ना हरकत प्रमाणपत्रासाठी पत्र व्यवहार आणि प्रक्रियेवरून असे दिसते की, ते कोळशावर आधारित सी.पी.पी. साठीच होते आणि सी.पी.पी. प्रकल्प जर विमानतळापासून ८ कि.मी. च्या आत असेल तर चिमणीचा वापर गरजेचा आहे. या अनुषंगाने भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या सल्यानुसार कोळशावर आधारित विद्युत निर्मिती संयंत्र विमानतळापासून ८ कि.मी. च्या आत उभारणे शक्य नसल्याने आणि कंपनीला हा प्रकल्प कोळशावर आधारितच उभारणे शक्य असल्याने या प्रकल्पाची जागा विमानतळापासून ८ कि.मी. च्या बाहेर हलविण्यात आली. इथे असे सांगण्यात येते की वरील नमूद केलेल्या परिस्थितीत कामाचे स्वरूप बदलल्यामुळे हे काम करण्यासाठी नवीन सल्लागाराची नियुक्ती किंवा त्याच सल्लागाराला हे काम देणे गरजेचे होते. मे. अर्नेस्ट ॲण्ड यंग ही सल्लागार कंपनी हे बदललेले काम आधीच्या रु. ३९.५० लाख या शुल्कावर करण्यास तयार झाली, तसेच त्यांनी आधी केलेल्या कामाचे शुल्क देण्याची विनंती केली त्यांनी त्यांचे आधीचे काम पूर्ण केलेले असतानाही कंपनीने त्यांना त्यांच्या रु. ३९.५० लाख या ठरलेल्या शुल्काच्या ७५ टक्के (रु. ३९.६३ लाख) एवढीच रक्कम दिली.

कंपनीने जर नवीन सल्लागार नियुक्त केला असता तर कंपनीला मे. अर्नेस्ट ॲण्ड यंग पेक्षा जास्त शुल्क द्यावे लागले असते. ज्यांना १ वर्षापूर्वी नियुक्त केले होते. इथे हे ही महत्त्वाचे आहे की, नवीन निविदा प्रक्रियेमध्ये २.९७ प्रती युनिटचा प्रस्ताव आला होता आणि पहिल्या निविदा प्रक्रियेमध्ये हाच दर ३.६९ प्रती युनिट होता. इथे असे नमूद करावेसे वाटते की, हा प्रकल्प हा विद्युत निर्मिती प्रकल्प असल्याने आणि तो विदर्भ आणि मिहान सेझ यांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याने तसेच या प्रकल्पासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने मान्यता दिली असल्याने त्याची प्रक्रिया ही औपचारिक प्रक्रियांसाठी पूर्ण पणे थांबविणे योग्य झाले नसते या प्रकल्प उभारणीसाठी जर वेळ लागला असता तर त्याचा खर्च वाढला असता व त्यामुळे प्रती युनिट २.९७ हा दर ही योग्य राहिला नसता इथे असे पुन्हा सांगण्यात येते की, कंपनीला हे माहीत नव्हते की, विमानतळाच्या ८ कि.मी. परिघात कोळशावर आधारित विद्युत प्रकल्प उभारणी शक्य नाही. इथे हे स्पटिकासारखे स्पष्ट आहे की, जर ही अट म.वि.वि.कं ला आधीच माहित असती तर या प्रकल्पासाठी दुसरी जागा निश्चित केली असती जे त्यानंतर केले. या अनुषंगाने कोणत्याही अधिकाऱ्याला जबाबदार धरले जाऊ शकत नाही.

प्रकल्पाची एकूण किंमत विचारात घेता स्थळ निश्चितीसाठी नियुक्त केलेल्या सल्लागारावर झालेला खर्च नाममात्र आहे. वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता एखाद्या योजनेमध्ये सद्भावपूर्ण विनाउद्देश चूक झाली असल्यास जबाबदारी निश्चित करणे उचित होणार नाही.

२.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने दिनांक १७ मार्च २००५ रोजी दिलेल्या Undertaking वरून कंपनीस प्रस्तावित धावपट्टीपासून ८ कि.मी. अंतरात फक्त तेल व विजेवर चालणारी भट्टी वापरण्याच्या प्रतिबंधात्मक अटीची पूर्वकल्पना होती, ही बाब स्पष्ट होते. सल्लागारांची नियुक्ती करण्यापूर्वीच प्रतिज्ञापत्र देण्यात आले आहे. भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाने दिनांक ८ ऑगस्ट २००५ रोजी सशर्त ना हरकत देताना प्रतिबंधात्मक अटींचा उल्लेख केला होता. किमान त्यानंतर महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने तातडीने भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडे फेरविनंती अर्ज सादर करणे, सल्लागारास याबाबत सूचित करणे/नियोजित स्थान बदलण्याचा विचार करून त्यानुषंगिक उपाययोजना करणे शक्य होते. तथापि, कंपनीने सल्लागार कंपनीचा अहवाल प्राप्त झाल्यावर निविदा प्रक्रिया सुरू केल्यावर माहे मे, २००६ मध्ये भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाकडे फेरविनंती अर्ज सादर केला आहे.

सबब, लेखा परिच्छेदात नमूद केलेला आक्षेप " सदोष व्यवस्थापकीय नियोजनामुळे रुपये २९.६२ लाख रुपये रकमेचा टाळता येण्याजोगा खर्च झाला " यात प्रथमदर्शनी तथ्य असल्याचे दिसून येते. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करणे योग्य राहील.

२.४ तद्नंतर याप्रकरणी समितीला सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक १६ फेब्रुवारी,२०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ४.६ मध्ये " टाळण्याजोगा खर्च "** या आक्षेपासंदर्भात समितीने विचारणा केली असता महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक यांनी असा खुलासा केला की, मे. अर्नेस्ट ॲण्ड यंग प्रा.लि. (इवायपी) या कंपनीला टेंडर दिलेले होते पुन्हा त्यांनाच टेंडर दिले. इवायपीला टेंडर दिले नसते तर पुन्हा कागदोपत्री टेंडर काढावे लागले असते. सदरचा प्रकल्प उभारणीसाठी दोन वर्षाचा काळ लागला असता. त्यामुळे मे.अर्नेस्ट ॲण्ड यंग प्रा.लि. यांना सदर प्रकल्पाचे काम कमी रेटमध्ये दिले आणि वेळेवर झाले. एकूण प्रकल्पाचा खर्च ३५० कोटी रुपयांचा होता यासाठी दोन तीन वर्षे लागले असते त्यामुळे पुन्हा दर वाढले असते. एएआयने एनओसी दिलेली होती त्यावेळी कोल फॅक्टर नव्हते. एएआयने दोन वर्षापूर्वी टेंडर देताना सांगितले होते की, ८ किलोमीटरच्या आत प्रकल्प उभारावा त्यानंतर जागेचा निर्णय घ्यावा लागेल.

यानंतर समिती प्रमुखांनी विचारणा केली की, समितीच्या माहितीप्रमाणे प्रतिज्ञापत्र केले होते की, कोळशाचा वापर करणार नाही या हमीवर सुरुवातीला एनओसी दिलेली आहे. आणि कागदपत्रांमध्ये खूप फरक आहे. तत्कालिन एम.डी. / वरिष्ठ अधिकारी यांनी प्रतिज्ञापत्र पत्र दिले होते, त्यावरच एनओसी मिळाली होती. त्यावेळी लक्षात आले की, हा कोळशावर आधारित प्रकल्प आहे म्हणून महालेखाकारांनी आक्षेप घेतला आहे. यावर विभागीय सचिवांनी व महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्षांनी खुलासा केला की, त्यावेळेला प्रशासनाची ही चूक झालेली आहे. विमानतळाची चिमणी विमान टेकऑफ होते तेथे लावली होती. एकदा औरंगाबाद येथे अपघात झाला होता एखाद्यावेळी चिमणी धुक्यामुळे दिसत नाही, काही प्रकरणे अशी होऊ शकतात. एएआय ने निकष ठरवून दिलेले आहेत, त्यानुसार जागेमध्ये बदल करावा लागतो. ही निश्चित चूक आहे, परंतु रक्कम मात्र मोठी नाही. त्या कारणाने जागा बदलली आणि दुसऱ्या जागेचा अभ्यास करावा लागला. जागेचे नियोजन करून जागेचा तपशील थोडा बदलावा लागतो. चिमणीचे अंतर किती असावे, याचे काही निकष असतात.

२.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ४.६ टाळण्याजोगा खर्च (मनाई असलेल्या क्षेत्रात स्वतःच्या उपयोगाकरिता कोळशावर आधारित ऊर्जा निर्मिती संयंत्र (कॅप्टीव पॉवर प्लान्ट) उभारण्याच्या निर्णयामुळे रुपये २९.६२ लाखाचा टाळण्याजोगा खर्च झाला)** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, भारतीय विमानतळ प्राधिकरणाने प्रस्तावित विमानतळाच्या आठ कि.मी. अंतरात फक्त तेल किंवा विजेवर चालणाऱ्या ऊर्जा निर्मिती प्रकल्पांना उभारण्यास मान्यता दिली असताना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने कोळशावर आधारित विद्युत निर्मिती प्रकल्प उभारण्यास बोली दस्तावेज (बीड डॉक्युमेंटस) तयार केले व निविदा आमंत्रित केल्या व एएआयकडे पुन्हा परवानगी मागितली. परंतु एएआयने परवानगी नाकारली त्यामुळे नवीन ठिकाणी ऊर्जा निर्मिती प्रकल्प स्थानांतरित करावा लागला. मे.अर्नेस्ट ॲण्ड यंग प्रा.लि. (ईवायपी) कंपनीला त्यांनी पूर्वी केलेल्या ७५% कामाकरिताचे रुपये २९.६२ लाख देण्यात आले. **अशा प्रकारे एएआयने परवानगी दिलेली नसताना अयोग्य ठिकाणी ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभा करण्यात येत असल्याची कल्पना असूनही सदोष नियोजनामुळे रुपये २९.६२ लाख अनाठाई खर्च झाला ही प्रशासनाची अक्षम्य चूक झाल्याचे दिसून येते. तसेच शासनाने देखील यासंदर्भात सदोष व्यवस्थापकीय नियोजनामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात यावी, असे ज्ञापनामध्ये नमूद केले आहे. त्यानुसार याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात येऊन जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच भविष्यात असे प्रकार पुन्हा होऊ नयेत यासाठी महामंडळाने / शासनाने उपाययोजना कराव्यात व याप्रकरणी केलेल्या चौकशीचा व कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

" महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित "
(सन- २०१०-२०११)

तीन - टाळता येण्याजोगा खर्च :—

(पारदर्शक निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता कन्सल्टन्सीचे कंत्राट उच्च दरावर दिल्यामुळे कंपनीला मार्च, २००९ मध्ये रुपये ९४.१३ लाखांचे टाळता येण्याजोगा अतिरिक्त खर्च करावा लागला.)

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-११ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१- मध्ये **" टाळता येण्याजोगा खर्च "** या शिर्षकासंदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (कंपनी) ने जळगांव, शिर्डी आणि सोलापूर येथे प्रस्तावित विमानतळ विकासासाठी प्रकल्प तयार करणे, आखणी व अंमलबजावणीसाठी कन्सल्टन्सी सेवा पुरविण्यासाठी छाननी केलेल्या तीन* देकारदारकांकडून " विनंती प्रस्ताव " (आरएफपी) (सप्टेंबर, २००८) मध्ये मागविले होते. मे.इंटरकॉन्टीनेंटल कन्सल्टंट ॲण्ड टेक्नोक्ट्रॅस प्रायव्हेट लिमिटेड, (आयसीटी) यांनी तिन्ही विमानतळासाठी कमी किंमतीचे देकार (एल १) दिले होते व त्यांनी जळगांव (ए १) साठी रुपये ९४.१८ लाख शिर्डी (ए २) साठी रुपये ७९.४८ लाख आणि सोलापूर (ए ३) साठी रुपये ८९.२८ लाखांचे देकार दिले होते. महामंडळाने आयसीटी जे की, भारतीय विमान प्राधिकरण (एएआय) यांच्या मान्यताप्राप्त यादीमध्ये समावेश होता त्यांची देकार त्यांनी कोट केलेली किंमत ही इतर दोन देकारदारांनी** कोट केलेल्या दरांपेक्षा खूपच कमी असल्याकारणाने फेटाळली (ऑक्टोबर, २००८) होती.

कंपनीने पुन्हा (नोव्हेंबर,२००८) प्रचलित तीन देकारदार तसेच अतिरिक्त देकारदार जे की, भारतीय विमान प्राधिकरण (एएआय) यांच्या मान्यताप्राप्त यादीत होते त्यांच्याकडून आर्थिक देकार मागितला होता. फ्रिशमॅन प्रभु यांनी तिन्ही विमानतळासाठी म्हणजेच ए-१ साठी रुपये ७५.४० लाख, ए-२ साठी रुपये ६५.८० लाख आणि ए-३ साठी रुपये ७५.४० लाखांची सर्वात कमी एल १ दरांची बोली दिली होती. तसेच दोन विमानतळाचे काम दिल्यास पाच टक्क्यांची कन्सल्टन्सी शुल्कावर सवलत देण्याची तयारी दाखविली होती.

परंतु दुसऱ्या देकारांच्या प्राप्तीनंतर, कंपनीने प्रथमच कन्सल्टन्सी कंत्राटाची अंदाजित किंमत प्रत्येक विमानतळासाठी रुपये १.३८ कोटी ठरवली होती आणि या अंदाजित किंमतीच्या १५ टक्केपेक्षा कमी किंमतीचा देकार योग्य राहणार नाही असे ठरवले. महामंडळाने फ्रिशमॅन प्रभु यांचे देकार फेटाळले व कन्सलटन्सी कामाचे कंत्राट आयसीटी यांना ए-१ साठी रुपये १.२५ कोटी तर मॉट मॅकडोनाल्ड प्रायव्हेट लिमिटेड यांना ए-२ साठी रुपये १.१९ कोटी आणि ए-३ साठी रुपये ९०.२५ लाख या उच्च दरावर देण्यात (मार्च, २००९) आले होते.

***मॉट मॅकडोनॉल्ड, स्कॉट विल्सन इंडिया प्रा. लि. व इंटरकॉन्टीनेंटल कन्सलटंट ॲन्ड टेक्नोक्ट्रॅस प्रा. लि.**

****मॉट मॅकडोनाल्ड प्रा. लि. ची बोली सर्व तिन्ही विमानतळासाठी रुपये ३९० लाख होती तर स्कॉट विल्सन इंडिया प्रा. लि. ची बोली अनुक्रमे रुपये १६९.३३ लाख, रुपये १७५.१० लाख आणि रुपये १६७.७९ लाख ए-१, ए-२ आणि ए-३ साठी होती.**

लेखापरीक्षकांच्या असे निदर्शनास आले की, कंपनीने कन्सलटन्सी कामाची अंदाजित किंमत न ठरवताच पहिल्या वेळेस तीन पक्षकारांकडून आर्थिक देकार मागितला होता. परंतु कंपनीने एएआय द्वारा मान्यताप्राप्त यादीतील सर्व पक्षकारांकडून देकार मागवावयास हवे होते. तसेच दुसऱ्या वेळेस देखील कंपनीने कामाची अंदाजित किंमत ठरवली नव्हती. दुसऱ्या वेळेस जेव्हा देकार आला व त्यांचे मूल्यमापन करताना कंपनीने अंदाजित किंमत ठरविली.

म्हणून आयसीटी आणि फ्रिशमॅन प्रभू यांची एल-१ देकार, देकारदारांनी पाहिल्या व दुसऱ्या वेळेस योग्य दर न दिल्याने फेटाळणे हे कसल्याही आधाराशिवाय होते व त्यात पारदर्शकतेचा अभाव होता. तसेच आयसीटी आणि फ्रिशमॅन प्रभू हे दोघेही एएआयच्या मान्यताप्राप्त यादीमध्ये ग्लोबल टेक्नीकल ॲडव्हाइझर म्हणून होते. परिणामतः रुपये ९४.१३ लाखांचा*** टाळता येण्याजोगा जादा खर्च झाला म्हणून अशी शिफारस करण्यात येते की, निविदा प्रक्रिया ही पारदर्शक व पद्धतशीर पद्धतीवर आधारित असावी. ही बाब शासनाला/व्यवस्थापनाला कळविण्यात (मे, २०११) आली होती, त्यांचे उत्तर प्रलंबित होते (नोव्हेंबर, २०११).

*****दुसऱ्या कॉल मधील फ्रिशमॅन प्रभू आणि प्रत्यक्षात कंत्राट दिलेल्या आयसीटी आणि मॉट मॅकडोनॉल्ड, प्रा. लि. यांचा दरातील फरक.**

३.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, पहिल्या वेळेस प्राप्त झालेल्या निविदांत ज्या तीन कंपन्यानी निविदा सादर केल्या होत्या. त्यात बऱ्याच मोठ्या प्रमाणात तफावत आढळून आली व त्या कारणास्तव निविदा फेटाळण्यात आल्या. ह्या कृतीच्या वाजवी समर्थनाकरिता भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाशी (एएआय) विचार-विनिमय करून आणखी निविदा मागविण्यात आल्या त्याला प्रतिसाद म्हणून आणखी काही निविदा प्राप्त झाल्या, ज्याची लेखा परीक्षकानीही नोंद घेतली आहे. हे खरे आहे की मे. फ्रिशमॅन प्रभू ह्या कंपनीची निविदा सर्वात कमी दराची होती. परंतु त्यांनी आपल्या निविदेत उपलब्ध मनुष्यबळासंबंधीच्या अनुसूचीचा अंतर्भाव केला नसल्यामुळे त्या कंपनीच्या पारिभाषिक क्षमतेबद्दल तर्क करणे कठीण होते. ह्या कामासंबंधी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने वाजवी अंदाजानुसार या कामासाठी रुपये १.३८ कोटी मूल्यनिर्धारण केले होते. मे. फ्रिशमॅन प्रभू कंपनीची निविदा ह्या मूल्यनिर्धारणाच्या अवाजवी प्रमाणात कमी दराची होती.

तथापि, दुसऱ्या क्रमांकावरील मे. मॉट मॅकडोनाल्ड कंपनीकडून शिर्डी व सोलापूरकरिता प्राप्त झालेल्या निविदा आणि मे. इंटरकॉन्टिनेंन्टल कंसल्टंट आणि टेक्नोक्ट्रॅस प्रा.लि. (आय. सी. टी.) कडून जळगांव विमानतळाकरिता प्राप्त झालेल्या निविदांना महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळाची मंजुरी प्राप्त झाली आहे. विमानतळांच्या कामांची निकड लक्षात घेऊन व औचित्यपूर्ण विचार करून वरील संस्थांची केलेली निवड ही योग्यच होती वरील गोष्टी लक्षात घेता संबंधित परिच्छेद लेखा परीक्षणातून वगळण्यात यावा, अशी महामंडळाने विनंती केली आहे.

३.३ याप्रकरणी महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

३.४ याप्रकरणी समितीने सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभाग आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक १६ जून २०१५ रोजी सामान्य प्रशासन (नागरी उड्डाण) विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये परिच्छेद क्र. ३.१ मध्ये " टाळता येण्याजोगा खर्च " या आक्षेपासंदर्भात विचारले असता महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी सोलापूर आणि जळगांव विमानतळाचे सल्लागार नियुक्तीबाबत दिनांक १५ ऑक्टोबर २००८ रोजी तीन सल्लागारांकडून निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यामध्ये मे. इंटरकॉन्टीनेंटल कन्सलटंट ॲण्ड टेक्नोक्ट्रॅस प्रायव्हेट लि. (आयसीटी) कडून जळगाव विमानतळासाठी ९४ लाख १८ हजार रुपये, शिर्डी विमानतळासाठी ७९ लाख ४८ हजार रुपये आणि सोलापूर विमानतळासाठी ८९ लाख २८ हजार रुपये याप्रमाणे प्रस्ताव आले होते. त्यानंतर मे.स्कॉट विल्सन इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून जळगांव विमानतळासाठी रुपये १ कोटी ६९ लाख ३२ हजार रुपये, शिर्डी विमानतळासाठी १ कोटी ७५ लाख १० हजार २५० रुपये, सोलापूर विमानतळासाठी १ कोटी ६७ लाख ७९ हजार रुपयांची निविदा आली होती.

मे. मॉट मॅकडोनाल्ड प्रायव्हेट लिमिटेड यांचेकडून जळगाव विमानतळासाठी ३.९० कोटी रुपये, शिर्डी विमानतळासाठी ३.९० कोटी रुपये, सोलापूर विमानतळासाठी ३.९० कोटी रुपये अशा निविदा प्राप्त झाल्या होत्या. या तिन्ही प्रस्तावांचे अवलोकन केले असता यामध्ये खूप तफावत असल्याचे आढळून आले. जळगाव विमानतळासाठी ९४ लाख रुपये आणि दुसरा प्रस्ताव ३.९० कोटी रुपये यामध्ये खूप मोठी तफावत होती. याव्यतिरिक्त एल-२ पाहिले तर ७५ लाख रुपयांपासून ते ९६ लाख रुपयांपर्यंत तफावत होती. एल-१ आणि एल-२ मध्ये तफावत नाही. निविदेच्या अटीनुसार जास्तीत जास्त दोन विमानतळासाठी काम देणे शक्य होते. ज्यावेळेस हा प्रस्ताव तपासला गेला त्यावेळेस एल-१ कंपनीने दिलेले मनुष्यबळ, त्यासाठी येणारा खर्च याची छाननी केली असता असे लक्षात आले की, यामध्ये मनुष्यबळाचा तपशील दिला गेलेला नसून केवळ सल्लागार चार्जेसचीच रक्कम दिलेली आहे. एका सल्लागाराला दोन विमानतळांची कामे देणे शक्य होते, परंतु तिसरे काम द्यावयाचे म्हटले तर ७५ लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च द्यावा लागला असता. त्यावेळेस असा निर्णय घेण्यात आला की, ही निविदा रद्द करून तिनही विमानतळांसाठी किमान किती खर्च अपेक्षित आहे, हे निश्चित करून निविदा पुन्हा बोलविण्याबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या आणि पहिल्या निविदा रद्द करण्याचा निर्णय घेतला. कामाची तातडी लक्षात घेऊन या ३ कंपन्यांना बोलाविण्यात आले होते. असा समिती समक्ष खुलासा केला.

यानंतर मे.मॉट मॅकडोनाल्ड प्रायव्हेट लि. ही कंपनी भारतीय विमान प्राधिकरणाच्या यादीमध्ये (एअरपोर्ट ॲथॉरिटी इंडियाच्या) आहे काय, ज्यांची नावे भारतीय विमान प्राधिकरणाच्या यादीमध्ये (एअरपोर्ट ॲथॉरिटी इंडियाच्या) नाहीत अशा कंपन्यांना विमानतळ कंपनीने बोलाविले आहे. पहिल्या निविदेमध्ये देखभाल, नियोजन व रचना (प्लॅनिंग, मेन्टेनन्स, डिझाईन) यांचा समावेश नव्हता. या समितीच्या प्रश्नावर महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकांनी पहिली निविदा मागविण्यात आली त्यामध्ये तांत्रिक चुका होत्या. त्यामध्ये मनुष्यबळ काढले नव्हते. प्रत्येक व्यक्तीला किती खर्च येईल, त्यामागचा अंदाजित खर्च दिला नव्हता. निविदा सादर करण्यात आल्या त्यावेळी त्यांची शैक्षणिक पात्रता मनुष्यबळ इत्यादी बाबींचा उल्लेख केलेला नव्हता. ही वस्तुस्थिती आहे. निविदा भरताना मनुष्यबळ, अभियंते, वास्तुरचनाकार यांची संख्या व त्यांची पात्रता या बाबींचा समावेश नव्हता. त्यामुळे त्या कमी रक्कमेच्या निविदा होत्या. असा साक्षीच्या शेवटी खुलासा केला.

३.५ अभिप्राय व शिफारस :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या कामकाजासंदर्भात परिच्छेद क्र. ३.१ " टाळता येण्याजोगा खर्च " या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीस साक्ष घेताना असे दिसून आले की, **महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादितने केवळ तीन कंपन्यांना निविदा स्पर्धेमध्ये उतरविले. निविदा प्रक्रियेमध्ये भारतीय विमान प्राधिकरणाच्या (एएआय) यादीमध्ये समाविष्ट असणाऱ्या जास्तीत जास्त कंपन्यांना सहभागी करून घेणे गरजेचे होते त्यादृष्टीने विमानतळ कंपनीने निविदा प्रसिद्ध करणे आवश्यक होते. अंदाजित खर्च काढण्यात आला नाही म्हणून विमानतळ कंपनीने मे.इंटरकॉन्टीनेंटल कन्सलटंट ॲण्ड टेक्नोक्ट्रॅस प्रायव्हेट लि. (आयसीटी) या कंपनीची निविदा रद्द केली. आणि पुन्हा विमानतळ कंपनीने मे. इंटरकॉन्टीनेंटल कन्सलटंट ॲण्ड टेक्नोक्ट्रॅस प्रायव्हेट लि. (आयसीटी) याच कंपनीला काम दिले, त्यामुळे यातून काय साध्य झाले, हे निष्पन्न होत नाही.** इंटरकॉन्टीनेंटल कन्सलटंट ॲण्ड टेक्नोक्ट्रस प्रायव्हेट लि. कंपनी शिर्डी विमानतळाचे काम ७९.४८ लाख रुपयांमध्ये करायला तयार होती, त्यांना काम दिले नाही. परंतु मे.मॉट मॅकडोनाल्ड प्रायव्हेट लि. यांना शिर्डी विमानतळाचे काम १.१९ कोटी रुपयांना दिले. यावरुन असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र विमानतळ विकास **कंपनीने कामाची अंदाजित किंमत न ठरविता पहिल्यावेळेस तीन पक्षकारांकडून आर्थिक देकार मागितला होता. भारतीय विमान प्राधिकरणाद्वारा मान्यताप्राप्त यादीतील पक्षकारांकडून देकार मागविणे आवश्यक होते तथापि, दुसऱ्या वेळेस देखील विमानतळ कंपनीने निविदाप्रक्रियेत मनुष्यबळ नमूद केले नसल्यामुळे कामाचा अंदाजित खर्च ठरविला नव्हता यामध्ये शासनाचे नुकसान झाले आहे.**

मे.मॉट मॅकडोनाल्ड प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी भारतीय विमान प्राधिकरणाच्या (एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया) मान्यता प्राप्त यादीमध्ये नाही. तरी देखील या कंपनीला सोलापूर विमानतळाचे काम देण्यात

आले होते. त्या कंपनीने काम पूर्ण केले नाही म्हणून त्यांना समाप्तीची (टर्मिनेशन) नोटीस देण्यात आली होती. आणि जी कंपनी भारतीय विमान प्राधिकरणाच्या (एअरपोर्ट ॲथॉरिटी ऑफ इंडिया) मान्यता प्राप्त यादीमध्ये आहे, त्यांना विमानतळ कंपनीने काम न देता जी कंपनी एएआयच्या मान्यता प्राप्त यादीत नाही त्यांना विमानतळाचे काम देण्यात आले आहे यावरुन असे दिसून येते की, विमानतळ कंपनीने जाणीवपूर्वक व हेतूपुरस्सरपणे भारतीय विमान प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या कंपन्यांच्या निविदांच्या बोली मागविण्यात आल्या नाहीत तसेच पारदर्शक निविदाप्रकीयेचा देखील अवलंब केला नाही, त्यामुळे शासनाचे रुपये ९४ लाखांचे नुकसान झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येते तसेच संचालक मंडळाने जरी या निविदा प्रक्रियेबाबत निर्णय घेतला असला तरी संबंधित अधिकाऱ्यांनी सर्व तांत्रिक बाबी संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे होते. तातडीची बाब म्हणून असा निर्णय घेतला असला तरी हेतू साध्य झालेला नाही. **विमानतळ निविदा प्रक्रियासंदर्भात तांत्रिक मागणी मंजूर न करता तांत्रिक मूल्यांकन कोणी केले आहे. याप्रकरणी शासनाने सखोल चौकशी करावी व संबंधित जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अशा प्रकारे तांत्रिक चुका/त्रुटी राहू नयेत, शासनाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी व कामामध्ये दिरंगाई होऊ नये यासाठी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून देण्यात यावी व उपरोक्त प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

" महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित "

(सन- २०१०-२०११)

चार - टाळता येण्याजोगे महसुलाचे नुकसान :—

(मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय गोदाम परिसर पोट भाडेपट्टीवर देणे व निणर्याचे परिव्यय लाभ विश्लेषण करण्यात अपयशामुळे कंपनीला रुपये ४.०६ कोटीच्या महसुलीचे नुकसान झाले. रुपये ७.३२ कोटीच्या दुरुस्ती खर्चाच्या प्रतिपूर्ती करण्याचे दायित्व आले)

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-११ च्या प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद क्रमांक ३.१३ मध्ये **" टाळता येण्याजोगे महसुलाचे नुकसान "** या संदर्भात महालेखाकारांनी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित (कंपनी) ने गोदाम परिसर एजन्सीज ज्यामध्ये एमपीटी (मुंबई पोर्ट ट्रस्ट), सिडको (महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित) व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (मालकांकडून) भाडेपट्टीने घेतल्या. भाडेपट्टा कराराच्या कलम २-डब्ल्यू प्रमाणे, कंपनी, मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय, गोदाम परिसर पोट भाडेपट्टीवर देऊ शकत नव्हती. तसेच कलम ५ प्रमाणे कोणतेही बांधकाम सुरू करण्यापूर्वी स्थानिक संस्थेची नकाशांना परवानगी व मालकांच्या परवानगीची गरज होती. कंपनीच्या व्यवहारात होणारी घट व उपलब्ध अतिरिक्त /शिल्लक गोदाम परिसर यापासून महसूल सुरू व्हावा या उद्देशाने कंपनीने खाली गोदाम परिसर अभिकर्त्यांना पोट भाडेपट्टीवर देण्याचा निर्णय घेतला व अभिकर्त्यांमार्फत गरजू उपयोगकर्त्यांना वखारपालन सेवा देण्यात येणार होत्या.

त्यानुसार, कंपनीने मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय सहा (मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, अहमदनगर, कळंबोली) ठिकाणांवरील आठ गोदाम परिसर अभिकर्त्यांना " लिव्ह अँड लायसन्स " तत्त्वावर पोट भाडेपट्टी आकारुन देण्यासाठी निविदा मागविल्या (जून, २००९), निविदांमधील शर्तीनुसार गोदामे परिसर " जसे आहे तसे " तत्त्वावर द्यावयाची होती व गोदामांच्या वापरासाठी सर्व दुरुस्त्या, जोडणी कामे, विद्युत जोडण्या इत्यादी अभिकर्त्यांनी त्यांच्या खर्चाने करावयाची होत्या. परंतु निविदांमधील शर्ती अमान्य असल्यामुळे व निविदेला अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे कंपनीने निविदा शर्तीमध्ये फेरबदल केला व त्यानुसार गोदामांच्या वापरासाठी आवश्यक दुरुस्त्या अभिकर्त्यांनी कंपनीच्या खर्चातून करायचे ठरले व हा खर्च कंपनीला मिळणाऱ्या मासिक लायसन्स फी मधून (समायोजित लायसन्स फी च्या ५० टक्के) करण्याचे ठरले आणि त्यानुसार फेर निविदा (ऑगस्ट, २००९) या मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय बोलविण्यात आल्या.

कंपनीला आठ गोदामांसाठी रु.३२.७२ लाख इतकी मासिक लायसन्स फी मिळणार होती व कंपनीने चार अभिकर्त्यांसोबत करार केला व त्यांना गोदामांचा ताबा (सप्टेंबर-ऑक्टोंबर,२००९) दिला. याबाबत मालकांना न कळविता कंपनीने गोदाम पोटभाड्याने देण्याचा व प्रस्तावित दुरुस्त्या करण्याचा निर्णय घेतला. परंतु गोदाम परिसराच्या मालकांनी यास विरोध केला व दुरुस्त्यांचे काम थांबविले (जानेवारी,

२०१०) व कंपनीस दुरुस्त्या करण्यापूर्वी रितसर परवानगी घेण्यास सांगितले. त्यानंतरच कंपनीने (फेब्रुवारी, २०१० मध्ये) अंदाजित खर्चासह प्रस्तावित दुरुस्त्यांचे नकाशे/प्लॅन मालकांकडे दिले व दुरुस्त्यांचे काम सुरू करून पूर्ण करण्याची परवानगी मागितली.

आमच्या असे निदर्शनास आले की, गोदाम परिसराच्या दुरुस्त्यांसाठी मालकांची परवानगी मिळणार नाही असे कंपनीने गृहित धरले व मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय गोदाम परिसर अभिकर्त्यांना पोट भाडेपट्टीवर देणे हे अधोरणी व चुकीचे होते. अशारितीने, गोदाम परिसरांचा ताबा मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय अभिकर्त्यांना देण्यात आल्यामुळे कंपनीला माहे जानेवारी, २०११ पर्यंत रु.४.०६ कोटींच्या (वसुलीयोग्य लायसन्स फी रु.४.५६ कोटी वजा मिळालेला महसूल रु.०.५० कोटी) महसुलाचे नुकसान झाले. शिवाय, दुरुस्त्यांवरील रु.७.३२ कोटी इतका खर्च मिळणाऱ्या फी मधून समायोजित करावयाचा आहे.

व्यवस्थापनाने असे म्हटले आहे (एप्रिल २०११) की, गोदाम परिसर पोट भाड्याने देण्यासाठी मालकांना कळविण्याची गरज नव्हती व दुरुस्त्यांसाठी मालकांची परवानगी घेण्याची गरज नव्हती कारण गोदाम परिसरातील दुरुस्त्या ह्या त्यांच्या संरचनात्मक बदल/फेरफार न करता करण्यात येणार होत्या, शासनाने या उत्तरास दुजोरा दिला (जून २०११). हे उत्तर तथ्यास धरून नाही कारण भाडेपट्टी कराराद्वारे पोट भाडेपट्टीसाठी तसेच दुरुस्त्यांसाठी मूळ मालकांची परवानगी घेणे गरजेचे आहे.

अशी शिफारस करण्यात येते की, कंपनीने आपली योजना आखण्यासाठी व पोट भाडेपट्टीवर गोदाम परिसर देण्यापूर्वी सर्व आवश्यक परवानग्या मालकांकडून व इतर संस्थांकडून घ्याव्यात व त्यानुसार आपल्या योजना निर्धारित कराव्यात.

४.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनाद्वारे महामंडळाने केलेल्या खुलाशामध्ये असे नमूद केले आहे की, आक्षेपाची नोंद घेण्यात आली असून महालेखाकार यांच्या अभिप्रायाशी सहमत आहेत. महामंडळाची गोदामे मूळ मालक, मुंबई बंदर विश्वस्त, सिडको, एमआयडीसी यांची पूर्वपरवानगी न घेता अभिकर्त्यांना पोटभाडेपट्टीने गोदामे देण्यात आलेली होती. अशाप्रकारे पोटभाडेपट्टीने गोदामे देताना नफा तोट्याचा विचार वस्तुनिष्ठ पद्धतीने न करता हा निर्णय घेतलेला होता. त्यामुळे महामंडळाला आर्थिक नुकसान झालेले आहे हे मान्य करण्यात येते. याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :–

माहे, जून २००९ मध्ये महामंडळाची ९ गोदामे ११ महिन्यांकरिता भाडेपट्टीने (लिव्ह अँड लायसन्स) देण्याकरिता निविदा आमंत्रित करण्यात आल्या होत्या. तथापि तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. डी. जी. फिलीप यांनी खालील कारणास्तव फेरनिविदा मागविण्याचे आदेश दिले.

१. प्राप्त निविदांमधील खुली जागा व बंदिस्त जागेसाठीचे दर हे स्पर्धात्मक वाटत नाहीत.

२. बंदिस्त जागेसाठीच्या उच्चतम व द्वितीय उच्चतम दराच्या बंदिस्त जागेसाठीच्या निविदाधारकाने या गोदामांच्या खुल्या जागेसाठी निविदा सादर केलेल्या नव्हत्या.

३. प्राप्त निविदेतील दरापेक्षा जास्त दर मिळण्याची शक्यता आहे.

तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. डी. जी. फिलीप यांनी निविदेतील अटी व शर्तींमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल केले आणि या बदलानंतर नव्याने गोदाम अभिकर्त्यांच्या नियुक्तीसाठी निविदा आमंत्रित करण्यात आल्या. या निविदेत गोदामे ११ महिन्यांच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर (लिव्ह अँड लायसन्स) तसेच पुढील कालावधीसाठी करारनाम्याच्या नुतनीकरणाची अट समाविष्ट करण्यात आलेली होती. निविदा प्रक्रिया पूर्ण करून गोदाम अभिकर्त्यांशी करारनामे करण्यात आले होते.

करारनामा करण्यापूर्वी निर्धारित करण्यात येणाऱ्या अटी व शर्तींसाठीच्या प्रारूपावर तत्कालीन प्रभारी महाव्यवस्थापक श्री. एस. सी. शहा यांनी त्यांच्या टिप्पणीत करारनाम्यातील काही अटी व शर्ती महामंडळाच्या हिताच्या विरुद्ध असल्याचे आणि जागांच्या मूळ मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय पोटभाडे पद्धतीने या जागा देणे गैरकायदेशीर असल्याचे आक्षेप स्पष्टपणे नमूद केले होते. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. डी. जी. फिलीप यांनी सदर आक्षेप खालीलप्रमाणे अभिप्राय देऊन धुडकावून लावले " गरज भासेल तेव्हा मूळ मालकांची परवानगी घेण्यात यावी. पोटभाडेकरू पोटभाडेपट्टीचे शुल्क देण्यास तयार असल्यामुळे या जागा भाडेतत्त्वावर देण्यास कोणतेही बंधन वा नुकसान नाही " व गोदाम अभिकर्त्यांशी हे करारनामे करण्यात आले.

महालेखाकार कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिनांक २८ जुलै २०११ ते ११ ऑगस्ट २०११ या कालावधीत आर्थिक वर्ष २०१०-२०११ चे अंकेक्षण केले व पोटभाडेतत्वावर केलेल्या करारांचा विषय महामंडळाच्या व्यवस्थापनाचे निदर्शनास आणला. यातील मुद्दे लक्षात घेऊन महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका, श्रीमती राधिका रस्तोगी, यांनी या जागांच्या मूळ मालकांकडे म्हणजेच मुंबई बंदर विश्वस्त, एमआयडीसी, सिडको यांच्याकडे खालील संदर्भांकित पत्राद्वारे जागा भाडेतत्त्वावर देण्यास परवानगी देणे तसेच आवश्यक दुरुस्त्यांसाठी प्रस्ताव सादर केले :-

१. मुंबई बंदर विश्वस्त यांना लिहीलेले पत्र क्र. एमएसएसआयडीसी/ सीडब्ल्यूएच/ २०१२-१३/ सीआर-७७/१३०, दिनांक २ जुलै २०१२,

२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना लिहीलेले पत्र क्र. एमएसएसआयडीसी/ सीडब्ल्यूएच/ २०१२-२०१३/सीआर-०१/६०, दिनांक ४ जुलै २०१२,

३. सिडको यांना लिहीलेले पत्र एमएसएसआयडीसी / सीडब्ल्यूएच- २०१२-१३ / सीआर-९८ / २०१२-१३ /९, दिनांक १६ एप्रिल २०१२.

मूळ मालकांची परवानगी अद्याप अप्राप्त आहे.

श्री. डी. एस. चरडे, तत्कालीन महाव्यवस्थापक यांनी सदर गोदामांच्या दुरुस्तीसाठी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. डी. जी. फिलीप, भाप्रसे यांचे परवानगीने निविदा मागविल्या.

सदर दुरुस्तीच्या कामास मुंबई बंदर विश्वस्त यांनी त्यांचे पत्र क्र.७१०३, दिनाक १२ जानेवारी २०१० अन्वये आक्षेप घेतला, त्यानंतर महामंडळाने या दुरुस्ती कामासाठी मुंबई बंदर विश्वस्त यांच्याकडे परवानगी मागितली. तथापि सदर परवानगी प्राप्त झालेली नसतानाही गोदामे दुरुस्तीच्या बाबतीत निविदा व इतर कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर गोदामे दुरुस्तीसाठी खर्चाचे अंदाजपत्रक रु. ७.१६ कोटी असताना महामंडळाने प्रत्यक्षात रु.४,०२,४९,७६८/- एवढा खर्च केलेला आहे. गोदामनिहाय झालेल्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र	गोदामाचे नाव	अंदाजपत्रक (रु.)	प्रत्यक्षात खर्च केलेली रक्कम (रु.)
(१)	(२)	(३)	(४)
१	शिवडी	३,३३,८१,२३४.००	२,८९,६१,९४९.२२
२	कॉटन ग्रीन	१८,४३,४७८.००	१८,४२,२६८.००
३	डी-१०,एमआयडीसी, वागळे इस्टेट, ठाणे	६५,४९,३६८.००	४२,२६,६७६.००
४	ए-३०१,एमआयडीसी, वागळे इस्टेट, ठाणे	१६,३०,५७६.००	१५,९४,०२७.००
५	चिंचवड, पुणे	४६,५५,९४५.००	३६,२४,८४८.००
६	कळंबोली	२,१३,३२,२०१.००	काम केले नाही
७	कोल्हापूर	१०,५९,९७६.००	काम केले नाही
८	अहमदनगर	११,०८,९५९.००	काम केले नाही
	एकूण	७,१५,६१,७३७.००	४,०२,४९,७६८.००

अहमदनगर, कोल्हापूर व कळंबोली येथील गोदामांची दुरुस्ती करण्यात आलेली नसल्यामुळे कुठलाही खर्च झालेला नाही. माहे मार्च, एप्रिल व जून, २०१० आणि एप्रिल, २०११ मध्ये विधीमंडळात मा. आमदारांनी गोदामे भाडेतत्त्वावर देण्याबाबत तसेच त्यांच्या दुरुस्तीसाठी करण्यात आलेल्या खर्चाविषयी विविध प्रश्न उपस्थित केलेले होते. यावर दिनांक ८ डिसेंबर २०१० रोजी विधानसभेत चर्चा झालेली होती. या चर्चेच्या उत्तरात मा.मंत्री महोदय यांनी असे अहवालात दिले होते की, ‘ अहवालाची छाननी सुरू असून तीन महिन्यात कार्यवाही पूर्ण करण्यात येईल ’. त्यामुळे गोदामांच्या दुरुस्तीवर झालेला खर्च हा महामंडळाच्या तालिकेवरील वास्तुविशारद/अभियंता यांचेमार्फत पुन्हा तपासण्यात येऊन खर्चाचे पुनर्विलोकन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यानंतर महामंडळाद्वारे विशेष मोहिमे अंतर्गत वरील पाच गोदामांची महामंडळाच्या तालिकेवरील वास्तुविशारद/अभियंत्याकडून पुनर्तपासणी करण्यात आली. त्यात असे आढळून आले की, शिवडी, चिंचवड, पुणे व ठाणे या गोदामांसाठी रु.४२,११,१११/- (रुपये बेचाळीस लाख अकरा हजार एकशे अकरा) एवढ्या रकमेची वाढीव देयके अदा करण्यात आलेली होती. तसेच करारनाम्यातील काही महत्त्वाची व आवश्यक कामे करण्यात आलेली नव्हती व काही करारनामाबाह्य कामे केलेली होती. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

अ.क्र.	गोदामाचे नाव	देयकात दर्शवलेली अधिकची रक्कम (रु.)	अनधिकृत कामे	कंत्राटदाराने न केलेली अधिकृत कामे
(१)	(२)	(३)	(४)	(५)
१	शिवडी	२७,१७,४२१.००	(१)एकूण जास्तीच्या बाबी, ४० ज्यातील बांधकामाच्या बाबी ३० व विद्युत बाबी १० (२)बांधकामाच्या अधिकच्या बाबींवरील रक्कम रु.४०,८८,५३०.०८ (३)अधिकच्या विद्युत बाबींवरील रक्कम रु.२,८२,८८०.५९ (४)एकूण अनधिकृत बांधकामावरील व अधिकच्या विद्युत बाबींवरील रक्कम- रु.४३,७१,४१०.६७.	बांधकामाच्या बाबी १९, रु.२१,१०,६६५ + विद्युत बाबी २९ रु.३३,१५,७७०/-
२	कॉटन ग्रीन	केलेल्या कामाची पडताळणी केल्यानंतर वास्तुविशारदांनी असा अहवाल दिला होता की, कंत्राटदाराने अंदाजपत्रकानुसार काम केले आहे व त्यात काही तफावत नाही. महामंडळाने मुंबई बंदर विश्वस्त यांना माहे डिसेंबर २०१० मध्ये (अस्तित्वात असलेल्या) इमारतीच्या दुरुस्तीसाठी परवानगी मागितली. पाठपुरावा केल्यानंतर मुंबई बंदर विश्वस्त यांनी जागेची तपासणी केली व त्यांचे पत्र दिनांक १३ जून २०११ द्वारे सूचित केले की, कंत्राटदाराने विनापरवाना अनधिकृत दुरुस्ती व अधिकची कामे या अगोदरच केलेली आहेत, ज्यामध्ये ५ केबिन, २ बाथरुम व २ वॉश रूम, पाण्याच्या टाक्या, मलवाहिका (सिवरेज लाइन) याचा समावेश आहे.		

(१)	(२)	(३)	(४)	(५)
			त्यांनी असेही नमूद केले की हे काम अनधिकृत आहे. ही कामे मूळ अंदाजपत्रकात समाविष्ट केलेली नव्हती. कंत्राटदाराने ही अधिकची तसेच अनधिकृत कामे म.ल.उ.वि. महामंडळ तसेच मुंबई बंदर विश्वस्त यांची परवानगी न घेता केलेली आहेत.	
३	डी-१०, एमआयडीसी, वागळे इस्टेट, ठाणे.	४,०९,५७१.००	(१) जूने दगडी बांधकाम तोडण्यासाठी (जुनी युसीआर मॅसोनरी डिस्मेंटलीन) देयक क्र.३ प्रमाणे ६३.३८४ घन मीटर रुपये १९.०१५. (२) २३० एमएम जाड मातीचे खोदकाम देयक क्र.३ प्रमाणे ११.१८७ घन मीटर रुपये १,६७८. (३) ८० एमएम खडीची परत(लेअर) देणे व २३० एमएम जाडीचा घनीकरण केलेला रस्ता-रुपये १,०१,२६३. (४) बाजूच्या भिंती तोडणे/पाडणे रुपये १३,५००/ एकूण रु.१,३५,४५६.	बांधकामे २ नंबर रुपये १,३०,२३१/-
४	ए-३०१, एमआयडीसी, वागळे इस्टेट, ठाणे	७,३९,७३८.००	जुने बांधकाम तोडणे व पाडणे - रुपये ५,११४.	बांधकामे ५ बाबी रुपये १,५३,६२९/-
५	पिंपरी, चिंचवड, पुणे	३,४४,३८१.००	(१) एकूण अधिकचे बांधकाम ३४ बाबी (२) अनधिकृत अधिक बांधकामाची रक्कम रु.१०,२५,३३१.३४	बांधकामे २४ बाबी रुपये २२,२५,७१९
	एकूण . .	**४२,११,१११.००**	**५५,३७,३१२.००**	**७९,३६,०१४.००/-**

वरील त्रुटीपूर्ण कार्य केल्यामुळे कंत्राटदार व या कामाच्या देखरेखेखाली म.ल.उ.वि. महामंडळाद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या वास्तुकारांना महामंडळाद्वारे नोटीस बजावण्यात आलेली आहे. गोदामनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे :—

अ. क्र.	गोदामाचे नाव	कंत्राटदार तसेच देखरेख वास्तुविषारद यांना दिलेल्या नोटीशीची तारीख व नंबर
(१)	(२)	(३)
१	शिवडी	१६/२ मे २०१२
२	डी-१०, एमआयडीसी, वागळे इस्टेट, ठाणे	१७/२ मे २०१२
३	ए-३०१, एमआयडीसी, वागळे इस्टेट, ठाणे	१७/२ मे २०१२
४	चिंचवड, पुणे	१५/२ मे २०१२

यावरील सर्व कामांसाठी कंत्राटदार व वास्तुविशारदाची नियुक्ती श्री. डी. एस. चरडे तत्कालीन प्रभारी महाव्यवस्थापक यांनी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. डी. जी. फिलीप यांच्या परवानगीने केली होती.

कंत्राटदारांनी केलेल्या कामासंबंधीची त्यांची देयके म.ल.उ.वि. महामंडळाकडे सादर केली. ती देयके तपासणीसाठी वास्तुविशारदाकडे तत्कालीन प्रभारी महाव्यवस्थापक, श्री.आर.एल.नागुलवार, श्री. एस. सी. शहा, श्री. डी. एस. चरडे यांनी पाठविलेली होती. देयकांच्या तपासणीनंतर व वास्तुविशारदाच्या शिफारसीअंती गोदाम अभिकर्त्यांना कंत्राटदारास भुगतान प्रदान करण्याचे निर्देश वरील अधिकाऱ्यांनी दिलेले होते.

कंत्राटदारास आणि वास्तुविशारदास भुगतान करण्याच्या सूचना देण्यापूर्वी देयकाप्रमाणे कंत्राटदाराने प्रत्यक्षात काम केलेले आहे किंवा नाही याची कोणतीही शहानिशा म.ल.उ.वि. महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी केलेली नव्हती. केलेल्या कामाच्या काही भागाची सुद्धा तपासणी केलेली नव्हती. व अशाप्रकारची कारवाई केल्याचा कोणताही निरीक्षण अहवाल आढळून येत नाही. वरील अधिकाऱ्यांनी आपल्या कामात दुर्लक्ष केले व अधिकाऱ्यांचा गैरहेतू दिसून येतो. जर, हे अधिकारी जागेवर गेले असते व तपासणी केली असती तर कॉटन येथील गोदामातील बेकायदेशीर बांधकाम त्यांच्या लक्षात आले असते. म्हणून सदर अधिकारी कंत्राटदारास झालेल्या चुकीच्या प्रदानासाठी जबाबदार आहेत. या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे बेकायदेशीर बांधकाम व बेकायदेशीर वाढीव कामासाठी कंत्राटदारांना भुगतान करण्यात आले. ज्या वास्तुकारांनी चुकीची देयके प्रदान करण्यासाठी प्रमाणित केली होती त्यांना त्यांच्या शुल्काच्या केलेल्या प्रदानासाठी श्री. आर. जी. होटकर हे जबाबदार आहेत.

मुंबई बंदर व विश्वस्त यांनी त्यांचे पत्र क्र.इएम/यु-१/एसई-१६एफ/ईएम/यु-३/ एमएसआरसीडी/ एमपी २७९/५६९६, दिनांक १७ डिसेंबर २०१२. अन्वये महामंडळास सूचित केले की, त्यांच्या करारनाम्यातील अटींचे उल्लंघन नियमानुकुल करणे व दुरुस्ती करणे प्रलंबित आहे तसेच मुंबई बंदर विश्वस्तचे शिवडी गोदामापोटी बाकी असलेले रु.४,१२,८२२/- कॉटनग्रीन गोदामापोटी बाकी असलेले रु.१६,०३,५१,०८८/- अवसायनाच्या माध्यमातून समायोजित होणे बाकी असल्यामुळे महामंडळाची गोदामे पोटभाड्याने देण्याबाबतची विनंती मान्य करणे शक्य नाही. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री.डी.जी.फिलीप, श्री. आर. एल. नागुलवार, श्री. एस. सी. शहा, श्री. डी. एस. चरडे, श्री. आर. जी. होटकर यांनी दुर्लक्ष केल्यामुळे व त्यांच्या निष्काळजीपणा व असद्भावपूर्वक हेतुमुळे हा विषय प्रलंबित राहिला व महामंडळाला वरील प्रचंड रक्कम अदा करावी लागत आहे.

सदर अनियमिततेबाबत महामंडळातील कर्मचारी सेवा नियमातील तरतुदीप्रमाणे श्री. आर. एल. नागुलवार, श्री. एस. सी. शहा, श्री. डी. एस. चरडे, श्री. आर. जी. होटकर या कर्मचाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्यात येत आहे. याप्रकरणी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. डी. जी. फिलीप व वरील अधिकारी यांनी केलेल्या गैरप्रकारासंबंधी सविस्तर अहवाल शासनास पत्र क्र. ३४ दिनांक ३० मे २०१३ अन्वये उचित कार्यवाहीसाठी तसेच शिस्तभंगविषयक कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

४.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालिका यांनी दिलेला खुलासा हा वस्तुस्थितीच्या आधारावर असल्यामुळे तो मान्य करण्यास हरकत नसावी.

४.४ तद्नंतर या प्रकरणी समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने उद्योग विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक ३ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ३.१३ मध्ये " टाळता येण्याजोगे महसुलाचे नुकसान " मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय गोदाम परिसर भाडेपट्टीवर देणे त्यामुळे महामंडळाचे रु.४.०६ कोटींच्या महसुलीचे नुकसान झाले. तसेच दुरुस्ती खर्चासाठी रु.७.३२ कोटींच्या प्रतिपूर्ती करण्याचे दायित्व आले** त्यामध्ये महामंडळाचे नुकसान झाले आहे त्यामुळे संबंधित व्यवस्थापकीय संचालक आणि अधिकारी कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करणे क्रमप्राप्त आहे, या समितीच्या भूमिकेच्या अनुषंगाने विचारणा केली, त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, लघुउद्योग महामंडळामध्ये एकूण ५ अधिकाऱ्यांचा समावेश होता. यामध्ये श्री. फिलीप यांच्या संदर्भातील रिपोर्ट दिलेला आहे. श्री. चरडे, हे डेप्युटी मॅनेजर होते आणि ते सन २०११ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. दिनांक २१ मार्च २०१२ रोजी ईएसआरमध्ये एमसीएसआरच्या तरतुदी कर्मचाऱ्यांना लागू होणार आहेत. याकरिता सुधारणा केलेली आहे. त्या सुधारणांनुसार त्यांच्या विरोधात आरोपपत्र बजाविण्यात आले होते. यानंतर संबंधितांनी माननीय उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाकडे रिट याचिका दाखल केली होती. परंतु, संबंधित अधिकारी सुधारणा करण्यापूर्वी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांना निर्दोष सोडण्यात आले होते.

श्री. नागुलवार यांच्या बाबतीत सन २०१५ मध्ये चौकशी अहवाल प्राप्त झालेला होता. या अहवालामध्ये चौकशी अधिकाऱ्यांनी काही मुद्यांवर भाष्य केलेले नव्हते. म्हणून विभागाने तो अहवाल रद्द केला. त्यानंतर पुन्हा दुसरा चौकशी अधिकारी नेमला होता. यानुसार त्यांच्याकडून माहे फेब्रुवारी,२०१६ मध्ये चौकशी अहवाल येणे अभिप्रेत होते. सदर चौकशी सह सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यामार्फत केली जात आहे. त्यानुषंगाने समितीने विचारणा केली की, त्यांनी त्यांचा अहवाल किती तारखेला सादर केलेला आहे. आता सन २०१६ सूरू आहे. आपल्याला जर काहीच कारवाई करायची नसेल तर तसे समितीला सांगावे. आपण फक्त चौकशी करीत आहात. संबंधित अधिकारी सेवानिवृत्त केव्हा होतो हे आपण वाट पहात असता. संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्याला सोडून दिले जाते, असे प्रकार होत आहे. अतः किती दिवसात कारवाई केली जाणार आहे.

याप्रकरणी खुलासा करतांना महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, अहवाल दिनांक ३० ऑगस्ट २०१४ रोजी सादर केलेला आहे व नंतर पुनः नव्याने सुरू करण्यात आली होती त्यानुसार मिळालेल्या

माहितीनुसार पुढील एक महिन्याच्या आत निर्णय घेतला जाणार आहे. तत्पुर्वी संबंधितांकडे पाठपुरावा करून १५ दिवसांच्या आत माहिती घेण्याची कार्यवाही केली जाणार आहे. त्यानुषंगाने समितीने विचारणा केली की, संबंधित अधिकाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन थांबविण्यात आलेले आहे काय, तसेच श्री. होटकर केव्हा सेवानिवृत्त होणार आहेत, त्यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, श्री. नागुलवारांचे निवृत्ती वेतन थांबविण्यात आलेले असून आहे. श्री. होटकर यांना सेवानिवृत्त होण्यासाठी अजून २ वर्षांचा कालावधी शिल्लक आहे. तसेच त्यांचा चौकशी अहवाल आलेला आहे व त्यानुसार या महिन्यात नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. यावर समितीने नमूद केले की, दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत ही सर्व कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करावी. असे सुचित केले व त्यास महामंडळाच्या प्रतिनिधींनी संमती दर्शविली.

४.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखापरीक्षणाच्या वेळी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ३.१३ " टाळता येण्याजोगे महसुलाचे नुकसान " मालकांच्या पूर्व परवानगीशिवाय गोदाम परिसर पोट भाडेपट्टीवर देणे व निर्णयाचे परिव्यय लाभ विश्लेषण करण्यात अपयशामुळे कंपनीला रु.४.०६ कोटींच्या महसुलीचे नुकसान झाले.रु.७.३२ कोटींच्या दुरुस्ती खर्चाच्या प्रतिपूर्तीकरण्याचे दायित्व आले** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, महामंडळाने भाडेपट्टीवर घेतलेले गोदाम परिसर कलम २ डब्ल्यू भाडेपट्टीवरील गोदाम देण्यापूर्वी व दुरुस्ती करण्यापूर्वी मालकाची पूर्व परवानगीशिवाय भाडेपट्टीवर देऊन महामंडळाचे रुपये ४.०६ कोटी महसुलाचे नुकसान झाले व दुरुस्ती खर्चासाठी ७.३२ कोटी रुपयांची निविदा मंजूर केली होती या प्रकरणात एकूण ४ अधिकाऱ्यांचा समावेश होता त्यापैकी श्री. डी. जी. फिलीप, श्री. आर. एल. नागुलवार, श्री. एस. सी. शहा, श्री. डी. एस. चरडे, श्री. आर. जी. होटकर यात दोषी आढळून आले होते. यावरुन असे आढळून येते की, **या अधिकाऱ्यांनी आपल्या कामात जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले व कंत्राटदाराची चुकीची देयके प्रदान करण्यासाठी प्रमाणित केले. अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे महामंडळाचे महसुलात नुकसान झाले आहे. अशा कर्तव्यामध्ये कसूर करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची तत्कालीन व्यवस्थापकीय संचालिका श्रीमती राधिका रस्तोगी, यांनी चौकशी केलेली होती त्यांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने अहवालामध्ये नमूद केलेल्या निष्कर्षानुसार पुढे दोन वर्षांमध्ये कोणतीही चौकशी अथवा कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कार्यवाही करण्यास दोन वर्षे विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांकडून याबाबत खुलासा मागविण्यात यावा व कार्यवाही करण्यासाठी विलंब करणाऱ्या तत्कालिन अधिकाऱ्याविरूद्ध शासनाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा तसेच तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक, श्री. डी. जी. फिलीप आणि संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध एक महिन्याच्या आत कार्यवाही करण्यात यावी. व त्यांच्याकडून झालेल्या नुकसानाची भरपाई वसूल करण्यात यावी. तसेच महामंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी महामंडळाच्या कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. अशी समितीची धारणा आहे. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

" महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित "

(सन- २०१३-२०१४)

पाच - महसुलाचे नुकसान :—

(परवानाधारकाकडून प्राप्त झालेल्या अनामत ठेवीपेक्षा येणे असलेल्या परवाना शुल्काची थकबाकी जास्त झाली होती व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितने तिची गोदामे त्वरित परत ताब्यात घेण्यास कसूर केल्यामुळे रु. ६४.८० लाख गोदामाच्या परवाना शुल्काची वसुली होऊ शकली नाही.)

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील परिच्छेद क्रमांक ४.१ मध्ये **" महसुलाचे नुकसान "** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितने (कंपनी) अहमदनगर आणि कोल्हापूर येथील दोन गोदामे अनुक्रमे मेसर्स गंगा विहार बिल्डकॉन प्रायव्हेट लिमिटेड व मेसर्स लालेग्रो मासकेसर्व लिमिटेड यांना भाडे तत्वावर दिली होती (ऑगस्ट, २००९) ही गोदामे कंपनीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) कडून जून,१९८६ (कोल्हापूर) व नोव्हेंबर,१९८७ पासून (अहमदनगर) ९५ वर्ष कालावधीसाठी भाडेपट्टा तत्त्वावर घेतली होती. अहमदनगर गोदामाचे क्षेत्रफळ १,५१३ चौरस फूट बांधीव व खुले क्षेत्रफळ १,१३,५८२ चौरस फूट होते. तर कोल्हापूर गोदामाचे क्षेत्रफळ ५,९५१ चौरस फूट बांधीव व खुले क्षेत्रफळ ६१,४८० चौरस फूट होते. झालेल्या करारानुसार (सप्टेंबर व ऑक्टोबर,२००९) अहमदनगर गोदामासाठी रु.२.३५ लाख व कोल्हापूर गोदामासाठी रु. १.७४ लाख मासिक परवाना शुल्क देय होते. करारात अशी तरतूद होती की गोदामांची आवश्यक दुरुस्ती कंपनीने करावी व दुरुस्तीवर होणारा खर्च हा परवानाधारकाने द्यावा की जो त्यांच्याकडून देय असलेल्या परवाना शुल्काच्या रकमेमधून समायोजित केला जाईल. दोन्ही गोदामे परवानाधारकास अनुक्रमे सप्टेंबर आणि ऑक्टोबर,२००९ मध्ये हस्तांतरित केली होती.

करारात असे नमूद केले होते की, दुरुस्तीची कामे दुरुस्ती कराराच्या तारखेपासून ९० दिवसांच्या अवधी (मोरॅटोरियम) मध्ये पूर्ण करावयाची होती. गोदामाच्या वापराची सुरूवात किंवा मोरॅटोरियम कालावधी ९० दिवस यापैकी जे आधी असेल त्या तारखेपासून परवाना शुल्क (लिजरेंट) देय होते. मार्च, २०१० मध्ये करार संशोधित करण्यात आला आणि त्यात कराराच्या तारखेपासून ९० दिवसांऐवजी, एमआयडीसीने दुरुस्ती कामाची मंजुरी कळविलेल्या तारखेपासून ९० दिवस अशी तरतूद केली. एमआयडीसीकडून दुरुस्तीच्या कामाची मंजुरी अहमदनगर गोदामासाठी मार्च, २०१० आणि कोल्हापूर गोदामासाठी ऑगस्ट, २०१० मध्ये प्राप्त झाली व कंपनीने दोन्ही गोदामांच्या दुरुस्तीसाठी रु.२१.८७ लाख किमतीचे कार्य आदेश (वर्क ऑर्डर) एप्रिल, २०११ मध्ये दिले. दुरुस्ती मात्र काही केली गेली नाही आणि कंपनीने दोन्ही गोदामांचा ताबा मार्च, २०१२ मध्ये आपल्याकडे घेतला.

लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले (मे, २०१४) की, करारांच्या अटीनुसार दुरुस्ती मंजुरीच्या तारखेपासून ९० दिवसांचा अवधी विचारात घेतल्यानंतर जुलै, २०१० पासून अहमदनगर गोदामाचे व डिसेंबर, २०१० पासून कोल्हापूर गोदामाचे परवाना शुल्क वसुली योग्य होते. परंतु कंपनीने, दोन्ही परवानाधारकावर जून, २०११ ते मार्च, २०१२ या अवधीसाठी रु.४०.८३ लाखाची बिले जारी केली ज्यांची अजूनपर्यंत (नोव्हेंबर, २०१४) वसुली झालेली नाही. कंपनीने आधीच्या कालावधीची अहमदनगर गोदाम जुलै, २०१० ते मे, २०११ (११ महिने) व कोल्हापूर गोदाम डिसेंबर, २०१० ते मे, २०११ (सहा महिने) अशी रु. ३६.२३ लाखांची बिले पारित केलेली नव्हती. अशाप्रकारे गोदामांचा ताबा परत घेईपर्यंत कंपनीने दोन्ही परवानाधारकांकडून वसूल करण्याजोगी परवाना शुल्काची रक्कम रु.७७.०६ लाख एवढी होती. खरेतर कंपनीने प्राप्त केलेल्या रु.१२.२६ लाख अनामत ठेवीच्या राशीपेक्षा जेव्हा परवाना शुल्काची थकबाकी जास्त होण्यास सुरूवात झाली त्याचवेळी गोदामांचा ताबा परत आपल्याकडे घ्यावयास हवा होता.

अशाप्रकारे करारांनुसार परवाना शुल्क वसुलीत कसुर करणे, प्राप्त अनामत ठेवीच्या राशीपेक्षा परवाना शुल्काची थकबाकी जास्त असून सुद्धा त्वरित गोदामाचा ताबा आपल्याकडे न घेणे व जून, २०११ पूर्वीच्या कालावधीच्या परवानगी शुल्काची मागणी न करणे इत्यादिमुळे रु.१२.२६ लाख अनामत ठेवीची राशी वळती केल्यावर रु.६४.८० लाख परवाना शुल्काची वसुली होऊ शकली नाही.

लेखापरीक्षणातील समाविष्ट बाबी मान्य करता (सप्टेंबर, २०१४) व्यवस्थापनाने सुचित केले की, त्यांनी दोन्ही परवानाधारकांवर दावे निर्गमित केले आहेत आणि ती राशी या परवानाधारकांकडून वसूल केली जाईल. या उत्तराला शासनानेही दुजोरा दिला होता (ऑक्टोबर, २०१४) व्यवस्थापनाचे उत्तर पटण्यासारखे नाही कारण व्यवस्थापनाने वेळीच कारवाई केली नाही परिणामतः केलेल्या दाव्याच्या वसुलीची शक्यता दुर्गम होते.

५.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाने कोल्हापूर येथील गोदाम मे. लालीग्रो मार्कसर्व प्रा.लि. आणि अहमदनगर येथील गोदाम मे. गंगा विहार बिल्डकॉन प्रा.लि. यांना भाडेतत्वावर दिले होते. या दोन्ही संस्थांसोबत केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार त्यांना देण्यात आलेल्या जागेच्या भाड्याची रक्कम ही गोदामाच्या दुरूस्तीची परवानगी मिळाल्यानंतर ९० दिवसांच्या आत दुरूस्ती पूर्ण करुन अथवा त्या अगोदर जर गोदामाचा वापर सुरू केला असेल तर यापैकी जे अगोदर असेल त्या तारखेपासून भाडे महामंडळास द्यावयाचे होते.

अहमदनगर येथील गोदाम मे.गंगा विहार बिल्डकॉन प्रा.लि. यांना भाडेतत्त्वावर दिले होते. सदर संस्था ही परवानगी मिळाल्यापासून ९० दिवसांत गोदामाची दुरुस्ती करु शकली नाही. तसेच संस्थेने महामंडळाने त्यांना भाड्यापोटी दिलेल्या बिलाचे भुगतान सुद्धा महामंडळास केलेले नाही. त्यामुळे मे. गंगा विहार बिल्डकॉन प्रा.लि. यांनी सुरक्षा रकमेपोटी दिलेले बँक अधिकोष हमीचे दिनांक १२ जानेवारी २०१२ रोजी

रोखीकरण करुन रु. ७.५ लक्ष एवढी रक्कम वसूल करण्यात आली. सदर संस्थेस दिलेल्या गोदामाचा एकतर्फी ताबा महामंडळाने दिनांक ५ मार्च २०१२ रोजी घेतला. सदर संस्थेकडे महामंडळाने वेळोवेळी भाड्याच्या रकमेची तसेच व्याजाची बिलेसुद्धा दिली होती. त्याचे भुगतान त्यांनी केले नाही.

कोल्हापूर येथील गोदाम लालीग्रो मार्कसर्व प्रा.लि. यांना भाडेतत्त्वावर दिले होते. सदर संस्था ही परवानगी मिळाल्यापासून ९० दिवसांत गोदामाची दुरुस्ती करु शकली नाही. तसेच संस्थेने महामंडळाने त्यांना भाड्यापोटी दिलेल्या बिलाचे भुगतान सद्धा महामंडळास केलेले नाही. त्यामुळे लालीग्रो मार्कसर्व प्रा.लि. यांनी सुरक्षा रकमेपोटी दिलेले बँक अधिकोष हमीचे दि.१२ डिसेंबर २०१२ रोजी रोखीकरण करुन रु.५,२५,०००/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली. सदर संस्थेस दिलेल्या गोदामाचा एकतर्फी ताबा महामंडळाने दि.४ मार्च २०१२ रोजी घेतला. सदर संस्थेकडे महामंडळाने वेळोवेळी भाड्याच्या रकमेची तसेच व्याजाची बिलेसुद्धा दिली होती. त्यांचे भुगतान त्यांनी केले नाही. महामंडळाने वेळोवेळी पारित केलेल्या देयकांच्या अदायगीसाठी पाठपुरावा केला. तसेच संस्थेस त्यांची व्याजासह रक्कम अदा करावी अथवा रक्कम व्याजासह वसूल करण्यासाठी महामंडळामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी नोटीस बजावण्यात आली आहे.

५.३ याप्रकरणी शासनाचे अभिप्राय नाहीत.

५.४ तद्नंतर याप्रकरणी समितीला उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने उद्योग विभागाचे प्रधान सचिव, तसेच महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितचे व्यवस्थापकीय संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक ३ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ४.१ मध्ये " महसुलाचे नुकसान " परवानाधारकाकडून प्राप्त झालेल्या अनामत ठेवीपेक्षा येणे असलेल्या परवाना शुल्काची थकबाकी जास्त झाली होती व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितने तिची गोदामे त्वरित परत ताब्यात घेण्यास कसूर केल्यामुळे रु.६४.८० लाख गोदामाच्या परवाना शुल्काची वसुली होऊ शकली नाही.** तसेच वास्तुविशारद यांनी रक्कम अदा करण्याबाबत सूचना केलेली होती. परंतु, महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी तपासणी केलेली नाही, असा आक्षेप नोंदविण्यात आलेला होता. विभागाने वास्तुविशारदावर कोणती कारवाई केलेली आहे, आपल्या मंडळामधून अशा वास्तुविशारदाला काढून का टाकले जात नाही, संबंधित वास्तुविशारद यांच्याकडून किती वसुली होणे बाकी आहे, वास्तुविशारद कोण आहेत, सद्यःस्थितीत हे तिनही वास्तुविशारद आपल्या मंडळामध्ये आहेत काय, अशी विचारणा केली.

त्यानुंषगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी साक्षीच्या वेळी खुलासा केला की, नोटीस दिलेली आहे. संबंधित वास्तुविशारदाला मंडळामधून काढून टाकण्यात आले आहे. त्यांच्याकडून वसुली करण्याबाबत नोटीस बजाविण्यात आलेली आहे. संबंधित वास्तुविशारद यांच्याकडून ४२ लक्ष रुपयांची वसुली करण्याचे बाकी

आहे. श्री. अलोक स्वर्णकार नावाचे एक, मे.ए.के.असोसिएटस दोन आणि मे.डिझाईनर डेकोर असे तीन वास्तुविशारद आहेत. सद्यःस्थितीत तिनही वास्तुविशारद आपल्या मंडळामध्ये नाहीत. यामध्ये कंत्राटदार लक्ष्मी केशव कन्स्ट्रक्शन. नावाची कंपनी आहे. त्यामध्ये ते वास्तुविशारद आहेत. तेच पुन्हा या ठिकाणी कंत्राटदार आहेत. यावर समितीने विचारले की, त्यांच्याकडून किती रकमेची वसुली करावयाची आहे, ही रक्कम व्याजासहीत वसूल केली जाणार आहे काय, यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, त्यांच्याकडून ४२ लक्ष रुपयांची वसुली करावयाची आहे. व सक्षम प्राधिकरणाकडे वसुलीसाठी प्रक्रिया सूरू केलेली आहे. गव्हर्नमेंट प्रिमायसेस इव्हिक्शन ॲक्ट अंतर्गत इव्हिक्शन प्रोसिडींग दाखल केलेल्या आहेत.

समितीने पुढे असे विचारले की, जे वास्तुविशारद आहेत. त्यांनी शासनाची फसवणूक केल्याबाबत वास्तुविशारद असोसिएशनला कळविणे महत्त्वाचे आहे. या वास्तुविशारदाची या संस्थेतील सदस्यत्वाची नोंदणी रद्द करण्यात यावी यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, नोंदणी रद्द केलेली आहे. यानुषंगाने महालेखाकारांनी विचारले की, हे प्रकरण गुंतागुंतीची आहे. बाकीच्या शासकीय गोदामाकडून महसूल मिळतो का, तसेच भाडेकरु तोच आहे का, यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, चार कोटी रुपयांपैकी २,१३,०००,०० रुपयांचा महसूल भाड्याच्या बदल्यात समायोजित झालेला आहे. या संदर्भातील महसूलाची थकबाकी रक्कम १,४८,००,००० रुपये इतकी आहेत यासंदर्भातील सन २०१८ पर्यंत हाच भाडेकरु ठेवावा लागणार आहे.

यावर समितीने पुढे आणखी विचारले की, ही गोदामे कोणी ताब्यात घेतलेली आहे किंवा कसे, यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, नगर येथील गोडावून सिसलचा प्रकल्प केलेला आहे. पुणे येथील गोदाम मे.ऑटोमोबाईल क्लस्टर या कंपनीला भाड्याने दिलेले आहे. ठाण्याच्या गोदामाबाबत जाहिरात काढलेली होती. काही भाडेकरुंचे अर्ज आलेले आहेत. एमआयडीसी बरोबर चर्चा करून त्यांची निवड करण्यात येईल. अहमदनगर येथे लघु उद्योजक आहेत, त्यांची औद्योगिक गाळ्यांची मागणी आहे. तो प्रस्ताव तयार केलेला आहे, सन २०१४ पासून एमआयडीसीने संमती दिलेली आहे. ठाणे येथे शेतक-यांनी आपल्या जमिनी अकृषिक करून गोदाम तयार केले. भिवंडी येथे चांगल्या जमीनी बिनशेती करून गोदामाला दिलेल्या आहेत. ठाण्यामध्ये सन २०१५ पर्यंत मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे गोदाम सुरू आहे. आता सन २०१५ मध्ये गंगा विहार येथे या जमिनीचा ताबा मिळालेला आहे. त्यालाही एक वर्ष पूर्ण झालेले आहे. मंडळाने त्याला भाड्याने देण्याकरिता मान्यता दिलेली आहे.

बाजारामध्ये शासकीय गोदामे कुठेही भाडेतत्वावर मिळत नाहीत. खाजगी गोदामे कमी किमतीमध्ये मिळतात अशी परिस्थिती आहे. बाजारामधील सारासार आढावा घेणे आवश्यक आहे. प्रचलित दरामध्ये शासकीय गोदामे भाडेतत्वावर दिली तरी चालण्यासारखे आहे. यामुळे होणारे संभाव्य महसूलाचे नुकसानही नियंत्रणात येईल. लघुउद्योग विकास महामंडळाचा निर्मितीचा उद्देश होता.

५.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी लेखा परीक्षणाच्या वेळी महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ४.१ " महसुलाचे नुकसान " परवानाधारकाकडून प्राप्त झालेल्या अनामत ठेवीपेक्षा येणे असलेल्या परवाना शुल्काची थकबाकी जास्त झाली होती व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादितने तिची गोदामे त्वरित परत ताब्यात घेण्यास कसूर केल्यामुळे रु.६४.८० लाख गोदामाच्या परवाना शुल्काची वसुली होऊ शकली नाही** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, वास्तुविशारद यांनी देयके अदा करण्याबाबत सूचना केली होती परंतु महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यांची तपासणी न करता देयके अदा केली. तसेच कराराच्या अटीनुसार दुरुस्ती मंजुरीच्या तारखेपासून ९० दिवसांचा अवधी विचारात घेतल्यानंतर महामंडळाने दोन्ही परवानाधारकांकडून वसूल करण्याजोगी परवाना शुल्काची रक्कम रुपये ७७.०६ लाख एवढी होती. कंपनीने प्राप्त केलेल्या रु. १२.२६ लाख अनामत ठेवीची रक्कम वळती केल्यावर रु. ६४.८० लाख परवाना शुल्काची वसुली करण्यात आली नाही. यावरून असे दिसून येते की सरकारी गोदामामध्ये काम करणाऱ्या महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जबाबदारी (Accountability) नसल्यामुळे महामंडळाचे आर्थिक नुकसान झाले होते याबद्दल समितीने नाराजी व्यक्त केली. तसेच **महामंडळाच्या मंडळावरील तत्कालीन वास्तुविशारद यांच्याकडून सदर रक्कम व्याजासहित वसूल करण्यात यावी व ही बाब वास्तुविशारदांच्या असोसिएशनकडे त्यांची नोंदणी रद्द करण्याबाबत कळविण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची प्रत समितीकडे सादर करण्यात यावी. तसेच शासकीय गोदामांचे भाडे व खाजगी गोदामांचे भाडे यांच्या दरामध्ये तफावत आहे, त्यामुळे शासकीय गोदामे कमी प्रमाणात भाडेपट्टीवर दिली जातात, परिणामी महामंडळाचे नुकसान होते. यासंदर्भात महामंडळाने प्रत्यक्ष बाजारभावाप्रमाणे स्पर्धात्मकरित्या भाड्याचे दर ठेवले तर महामंडळाचा फायदा होईल, जेणेकरुन महामंडळाचे नुकसान टाळता येईल असे समितीचे मत आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

" हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित "

(सन- २०१२-२०१३)

सहा - लेख्यांचे प्रमाणिकरण विलंबाने केल्यामुळे महसुलाचे नुकसान :—

(वार्षिक लेख्यांचे प्रमाणिकरण न केल्यामुळे कंपनीची पोलिओ लसीच्या पुरवठ्यासाठीची निविदा अस्वीकृत केली त्यामुळे कंपनीने रु. ६.४३ कोटीचा महसूल मिळण्याची संधी गमावली).

6.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या प्रकरण क्रमांक ४ मधील {[illegible]4.10 "[illegible]" **लेख्यांचे प्रमाणिकरण विलंबाने केल्यामुळे महसुलाचे नुकसान "** या संदर्भात महालेखाकारांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले होते की, रेल इंडिया टेक्निकल ॲन्ड इकोनॉमिकल सर्विसेस लिमिटेड (राईटस) यांनी ओरल पोलिओ बायव्हालेण्ट लशीचा (बीओपीव्ही) १५ लाख वायल्सचा एका वायलमध्ये २० डोसेज, दोन बॅचेस/ शेडयूलसमध्ये पुरवठा करण्यासाठी निविदा मागविली होती व त्यात हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादित (कंपनी) सहभागी झाली होती (ऑगस्ट,२०१०). कंपनीने कारखाना पातळीवर किंमत (Ex-works) रु.११९.३४ प्रति वायल अशी बोली लावली होती. परंतू त्याची वास्तविक किंमत रु.७६.४५ प्रति वायल होती व कंपनीचे मार्जिन (अंशदान) रु. ४२.८९ प्रति वायल येत होते.

निविदा दस्ताऐवजाच्या अटींनुसार, एक शेडयुलच्या पुरवठयासाठी बोलीदाराची किमान वार्षिक उलाढाल रु. ६५.२५ कोटी हवी होती व दोन शेडयूलच्या पुरवठयाकरिता सन २००९-१० पर्यंत संपणाऱ्या मागील तीन आर्थिक वर्षांची एकत्रित उलाढाल रु.१३०.५० कोटी अशी हवी होती. बोलीदाराच्या उलाढालीला लेखापरीक्षित आर्थिक विवरणांचा आधार असणे आवश्यक होते.

आमच्या असे निदर्शनास आले (एप्रिल,२०१३) की कंपनीने वार्षिक लेख्यांचे लेखापरीक्षण सन २००७-२००८ पर्यंत पूर्ण केले होते. म्हणून कंपनीने सन २००७-०८ चे लेखापरीक्षित झालेले वार्षिक अहवाल व सनदी लेखापालाने सन २००८-२००९ व २००९-१० चे प्रमाणित केलेले एक पानी वार्षिक उलाढाल विवरणपत्रे सादर केली होती. ज्यामध्ये उलाढाल अनुक्रमे रु.८८.९८ कोटी, रु.२६.२७ कोटी व रु.१६८.८१ कोटी दाखविली होती. कंपनी एल-१ होती व राईटसने सन २००७-०८ची उलाढाल रु.८८.९८ कोटी लक्षात घेता केवळ एका बॅचची/ शेडयुलची रु.१८.२८ कोटीची ऑर्डर दिली. तथापि, उलाढालीला लेखापरीक्षित झालेल्या आर्थिक लेख्यांचा (२००८-०९ व २००९-१०) आधार नसल्यामुळे व या अटीचा निविदेत उल्लेख असल्याकारणाने दुसऱ्या गटासाठी /शेडल्युसाठी ऑर्डर मिळू शकली नाही.

अशा प्रकारे, सन २००८-०९ व २००९-१० चे वार्षिक लेखे तयार करणे व त्यांचे लेखापरीक्षण करून घेण्यामध्ये कंपनीला अपयश आल्यामुळे दुसऱ्या गटाचा आदेश मिळवण्याची संधी गमवावी लागली व त्यामुळे अंदाजित रु.६.४३ कोटी महसुलास मुकावे लागले.

व्यवस्थापनाने असे म्हटले (नोव्हेंबर, २०१३) होते की, कौशल्यपूर्ण कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे लेख्यांना वेळेत अंतिम रूप देता आले नाही. उत्तर समर्थनीय नव्हते कारण कंपनी कायदा, १९५६ च्या कलम १६६ व २१० अंतर्गत कंपनीला प्रत्येक आर्थिक वर्षाच्या लेख्याला त्या आर्थिक वर्षाच्या समाप्तीपासून सहा महिन्यांच्या आत अंतिमरूप देणे बंधनकारक होते.

ही बाब शासनाला कळविण्यात (जुलै, २०१३) आली होती. त्यांचे उत्तर प्रलंबित होते. (डिसेंबर,२०१३).

६.२ याप्रकरणी समितीला पाठविलेल्या स्पष्टीकरणात्मक लेखी ज्ञापनात महामंडळाने खुलासा करताना असे नमूद केले आहे की, प्रस्तुत प्रकरणी खालील संबंधित व एकत्रित मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहेत :—

(१) दिनांक २.११.२०१० च्या मे. राईटस लिमिटेड यांना सादर केलेल्या निवेदनात वर्ष २००९-२०१० या आर्थिक वर्षात कंपनीने रु.१६८८१.१२ लक्ष रुपयांची विक्री उलाढाल केल्याचे नमूद केले होते. तसेच मे. राईटस लिमिटेड यांना पूर्वी कळविल्यानुसार कंपनीच्या लेखे पुस्तकातून व चार्टर्ड अकाऊंटंट यांनी सदर बाब प्रमाणित केलेली आहे आणि म्हणूनच bopv खरेदीच्या निविदा क्र.RITES/ MSM/EPW/ PESP/01/2010 संदर्भात सदर bopv चे आदेश मिळण्यासाठी निश्चित केलेल्या निकषांची पूर्तता कंपनी करत आहे (सहपत्र-I).

(२) उपरोक्त विवेचन ध्यानात घेता कंपनीसाठी bopvचे आदेश निर्धारित करताना (उपरोक्त नमूद निविदेअंतर्गत) कंपनीसाठी प्राथमिक पात्रतेची अट ही विक्री उलाढाली संदर्भात असून (निव्वळ नफा वा निव्वळ संपत्ती नाही) चार्टर्ड अकाऊंटंटने प्रमाणित केलेले वर्ष २००९-२०१० चे लेखे विचारात घ्यावेत अशी विनंती मे. राईटस लिमिटेड यांना केलेली होती.

(३) दिनांक १५.१२.२०१० च्या मे. राईटस लिमिटेड यांना सादर केलेल्या (सहपत्र-II) निवेदनान्वये निविदा पूर्व झालेल्या बैठकीत उलाढालींसंबंधात कंपनीने उलाढाल विषयक मुद्दा राखून ठेवला होता. तसेच हा मुद्दा आदेश वितरित करताना निर्णायक निकष असू नये असेही नमूद केले होते. कारण ह्यापूर्वी युनिसेफ किंवा भारत सरकारने त्यांच्या पूर्वीच्या खरेदी निविदेमध्ये सदर मुद्दा कधी लादला नव्हता. तरी देखील सदर निष्कर्ष लावायचा ठरला तर तो मागच्या वर्षीच्या उलाढालीपुरता मर्यादित ठेवावा व चालू उलाढाल चार्टर्ड अकाऊंटंट मार्फत प्रमाणित केली जावी.

(४) कंपनीने दिनांक १९.११.२०१० च्या पत्रान्वये मे. राईटस लिमिटेड यांची चुकीची कृती आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या निदर्शनास आणली होती. सदर मंत्रालयाने कंपनीच्या पत्राची गंभीर दखल घेऊन मे. राईटस लिमिटेड यांच्याकडे कंपनीला bopv चे आदेश न दिल्याने विचारणा केली होती. आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालय, भारत सरकार यांनी त्यांच्या

दिनांक ६.१.२०११ च्या पत्रान्वये (सहपत्रक-I). कंपनी कायदा, १९५६ च्या अनुषंगाने मे. राईटस लिमिटेड यांनी वर्ष २००९-२०१० चे लेखे संदर्भात अट नमूद करताना त्या आर्थिक वर्षाचे तात्पुरत्या स्वरुपातील प्रमाणित लेखे स्विकारार्ह केले पाहिजेत असे कळविले होते. मंत्रालयाने सदर पत्रात निविदेमध्ये अशा प्रकारची अट नसल्याने हाफकिन महामंडळाला मे. राईटस लिमिटेड यांच्या शेडयूल-VI साठीच्या पुरवठा आदेश प्राप्त करण्यापासून वंचित राहावे लागल्याचे नमूद केले आहे. सदर पत्रात हे मंत्रालय पुढे नमूद करते की जरी सन २००७-२००८ चे लेखापरीक्षण पूर्ण झालेले लेखे विचारात घेतले तरी मे.राईटस लिमिटेड यांनी महामंडळास शेडयूल्ड-VI साठी १०.१९ कोटी डोसेजचा पुरवठा आदेश देणे आवश्यक होते.

(५) उपरोक्त नमूद पत्रावरुन व त्यातील मुद्यांवरुन आरोग्य व कुटूंबकल्याण मंत्रालयाने देखील कंपनीने उपस्थित केलेल्या मुद्यास व दृष्टीकोनास पाठिंबा दर्शवला आहे. कंपनीने दिनांक ३ फेब्रुवारी, २०११ च्या मंत्रालयास लिहिलेल्या पत्रान्वये (सहपत्र-IV) कंपनी WHO मानकांआधारित OPV चा पुरवठा आंतरराष्ट्रीय व भारत सरकार यांना करते. कंपनीने सादर केलेली किंमत व इतर पुरवठा-धारकांची किंमत यामध्ये लक्षणीयपणे फरक जाणवतो. हाफकिन महामंडळाच्या निविदेमधील सहभागामुळे बाजारात किंमतीवर नियंत्रण व बंधन राहते हे वेगळया अर्थाने येथे नमूद करता येईल. सन २००९-२०१० करीता युनिसेफ यांनी महामंडळाकडे रुपये १६९ कोटीच्या पुरवठयाचे आदेश वितरीत केले हे हाफकिन महामंडळाची भक्कम तांत्रिक व आर्थिक स्थिती निदर्शक असून मे.राईटस लिमिटेड यांना आदेशाबरहुकूम पुरवठा करण्यास महामंडळ सक्षम असल्याचा पुरावाच आहे. ३० मिलियन डोससाठी हाफकिन महामंडळाकडे आदेश न नोंदविल्यामुळे L1 व L2 पुरवठादारांच्या किंमतीमध्ये असलेल्या रुपये १६.४२ प्रती वायल एवढया फरकाच्या रक्कमेमुळे सरकारवर अतिरिक्त वित्तीय भार पडेल ही बाब देखील सदर पत्रात नमूद केलेली आहे. भारत सरकारने महामंडळाच्या निवेदनाची गंभीर दखल घेतली ही बाब स्पृहनीय आहे. तसेच मे.राईटस लिमिटेड यांच्या निविदा प्रक्रियेतील त्रुटी देखील त्यांना निदर्शनास आणून दिल्या. सदर प्रकरणी भारत सरकारने वेळेवर केलेल्या हस्तक्षेपामुळे महामंडळाने सरकारचे प्रती संवेदना प्रकट केली आहे व ३० मिलियन डोस एवढया संपूर्ण पुरवठयाचे आदेश महामंडळाकडे नोंदवावेत अशी विनंती केली कारण महामंडळ हा राज्य शासनाचा उपक्रम असून आंतरराष्ट्रीय ख्याती असून गेली कित्येक वर्षे भारत सरकार व युनिसेफसाठी OPVपुरवठयाचा उत्कृष्ट इतिहास महामंडळास आहे.

(६) दिनांक ३१ डिसेंबर २०१० रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत देखील सदर प्रकरणी दखल घेण्यात आली. तसेच अशा प्रकरणी मे. राईटस लिमिटेड यांच्याबाबत कायदेविषयक कारवाई करता येईल का, या प्रश्नावर महामंडळाच्या विधीतज्ञांबरोबर चर्चा केली आहे.

(शा.म.मु) एचबी ३०७३—४ (७५०—४-२०१६)

(७) उपरोक्त वस्तुस्थिती ध्यानात घेता मे.राईटस लिमिटेड यांनी केलेली कृती निश्चितच समर्थनीय नसल्याचे स्पष्ट आहे. असे वाटते. महामंडळाने आपली क्षमता व अधिकार OPV पुरवठयाची इच्छा व्यक्त केली. संपूर्ण क्वांटिटी (संख्या) पूर्वीच्या वर्षांची वार्षिक विक्री उलाढाल ध्यानात घेता योग्यच होती. युनिसेफ व भारत सरकार यांनी सुद्धा लेखापरीक्षा पूर्ण झालेले लेखे अहवाल सादर करण्याची पूर्व अट पुरवठा आदेश महामंडळास देताना ठेवली नव्हती किंवा त्याबाबतीत ते आग्रही देखील नव्हते व याच कारणामुळे मे. राईटस लिमिटेड यांनी ३० मिलियन OPV डोसचा पुरवठा आदेश कुठल्याही कारणाशिवाय नाकारला यामुळे सार्वजनिक संपत्तीचे नुकसान झाले हा मुद्दा कुठल्याही सबळ कारणाशिवाय नाकारला आहे. केंद्रीय सार्वजनिक उपक्रम असलेल्या मे.राईटस लिमिटेड यांची कृती कायदेविषयक अनुषंगाने योग्य आहे किंवा कशी याची पडताळणी होणे आवश्यक आहे.

(८) मे. राईटस लिमिटेड यांच्या विरुद्ध कार्यवाही जरी प्रस्तावित केली होती तरी देखील नंतर असे ध्यानात आले की, दुसऱ्या सार्वजनिक उपक्रमाबरोबर कायदेविषयक वाद सुरू करणे समर्थनीय होऊ शकत नाही. तथापि सदर बाब मे. राईटस लिमिटेड यांना नंतर झालेल्या बैठकीमध्ये आक्रमक व प्रभावीपणे स्पष्ट करण्यात आली की, उलाढालीचा निकष हा निदानानुसार आदेश नोंदविण्यासाठी निर्णय घेण्याचा मुद्दा असू नये व त्याबाबत महामंडळाने आपला आक्षेप राखून ठेवला आहे. कारण युनिसेफ किंवा भारत सरकार यांनी OPV च्या खरेदी निविदेत अशी अट यापूर्वी कधीही लादली नव्हती. तरी देखील अशा प्रकारची अट देण्याचे निश्चित करताना घातली तर चार्टर्ड अकाऊंटंट यांनी प्रमाणित केलेली वार्षिक विक्री उलाढालीची रक्कम हा पुरेसा कागदोपत्री पुरावा म्हणून ग्राह्य धरावी. कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत तरतुदीनुसार देखील लेखा परीक्षा पूर्ण झालेले लेखे अहवालच पाहिजेत असा आग्रह नाही.

(९) वार्षिक लेख्यांना अंतिम स्वरूप देण्याच्या विलंबाची अनेक कारणे आहेत. वर्ष २००६-२००७ मध्ये व्यवस्थापक (लेखा) व व्यवस्थापक (परिव्यय लेखा) यांच्यात झालेले बदल हे एक आहे. वर्ष २००६-२००७ पर्यंत सदर पदांवरील अधिकारासंदर्भात सातत्य होते. परंतू सदर पदांवरील व्यक्तींचा राजीनामा किंवा सेवानिवृत्तीनंतर सदर सातत्य संपुष्टात आले. ज्याच्या लेखे अंतिम करण्यावर प्रतिकूल परिणाम झाला. वर्ष २००८-२००९, २००९-२०१० व २०१०-२०११ साठीचे वार्षिक लेखे लेखापरीक्षण होऊन पूर्ण झाले आहेत.

सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचे लेखे लेखा शाखेकडे प्रलंबित असल्याचे उपरोक्त प्रकरणी आढावा घेताना निदर्शनास आले. त्यासाठी कंपनीने पूर्वी महालेखाकारांच्या आक्षेपांना उत्तर देण्यासाठी लेखापरीक्षा अधिकाऱ्यांच्या सल्ल्यासाठी प्रकल्प विभागाच्या प्रकल्प मूल्य व वित्तीय नियोजन करण्यासाठी तसेच महामंडळाची दुय्यम कंपनी हाफकिन अजिंठा फार्मा. लि. यांचे वार्षिक लेखे पूर्ण करण्यास नियुक्त केलेल्या सल्लागाराची नियुक्ती सदर कामासाठी करण्याचे निश्चित करण्यात आले. वर्ष २००९-२०१०, २०१०-२०११ व २०११-२०१२ (HAPL) यांचे लेखे यशस्वीपूर्ण पूर्ण करणारे श्री. पी.व्ही.बापट यांची नियुक्ती मे,२०१३ पासून पुढील ६ महिन्यांकरिता वाढविण्याचे ठरविण्यात आले.

तद्नंतर सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षाचे वार्षिक लेखे पूर्ण करण्याच्या दृष्टिने सल्लागारांच्या मदतीने कार्यवाही करण्यात आली. त्यानुसार आजमितीस आर्थिक वर्ष २०११-२०१२ आणि २०१२-२०१३ चे लेखे पूर्ण करण्यात आले, त्यास संचालक मंडळाची मान्यता मिळाली व त्याची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक १० जुलै २०१५ रोजी घेण्यात आली.

आर्थिक वर्ष २०१३-२०१४ च्या लेख्यांस संचालक मंडळाच्या दिनांक ७ ऑगस्ट २०१५ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता घेण्यात आली व सदर लेखे हे भारताचे महालेखानियंत्रक व महालेखाकार (The Comptroller & Auditor General of India) यांच्या अभिप्रायाकरीता पाठविण्यात आले आहे.

आर्थिक वर्ष २०१४-२०१५ च्या लेख्यांना अंतिम रूप देण्याची प्रक्रिया चालू आहे व लवकरात लवकर ते पूर्ण करण्यात येतील.

उपरोक्त विवेचन ध्यानात घेता लेखापरीक्षा परिच्छेद कृपया वगळण्याची विनंती आहे.

६.३ याप्रकरणी शासनाने असे मत व्यक्त केले की, महामंडळाच्या अभिप्रायाशी शासन सहमत आहे.

६.४ तद्नंतर याप्रकरणी समितीला वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन व हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने समितीने वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाचे अपर मुख्य सचिव, तसेच हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादितचे कार्यकारी संचालक व इतर अधिकारी यांची दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी महालेखाकारांनी लेखापरीक्षणामध्ये **परिच्छेद क्र. ४.१० मध्ये " लेख्यांचे प्रमाणिकरण विलंबाने केल्यामुळे महसुलाचे नुकसान "** या घेतलेल्या आक्षेपासंदर्भात समितीने पंचगुणी लस तयार करण्याचा फॉर्म्युला हाफकिनला कोणामार्फत मिळाला आहे, असा प्रश्न केला त्यावर महामंडळाच्या प्रतिनिधींनी डीपीटीचा फॉर्म्युला महामंडळाकडे असून डीपीटी सुरूवातीपासून महामंडळाकडे बनविली जाते. हेपाटायटीस-बी, ह्युमन इन्फ्ल्युएन्झा व्हॅक्सीनचे तंत्रज्ञान दुसऱ्या कंपनीकडून घेण्यात येते किंवा इतर कंपन्यांकडून त्याचे अर्क विकत घेऊन त्याचे फॉर्म्युलेशन येथे करण्यात येते असे उत्तर दिले. सन २००८-२००९ व २००९-२०१० मध्ये लेखापरीक्षण प्रमाणित न केल्यामुळे पोलिओ लसीकरणाची निविदा अस्वीकृत झाली होती. त्यामुळे अंदाजित रु. ६.४३ कोटी महसुलास मुकावे लागले. अशी विचारणा समितीने केली असता, महामंडळाच्या प्रतिनिधींनी नमूद केले की, आर्थिक वर्ष संपल्यानंतर आर्थिक लेखे बारा महिन्याच्या आत महामंडळाच्या सार्वजनिक सभेमध्ये मंजूर करावे लागतात.

परंतु मे.राईट्स नावाची (रेल इंडिया टेक्नीकल ॲण्ड इकॉनॉमिकल सर्व्हीसेस) ही शासनाची रेल्वे खात्यातील कंपनी आहे. त्यांनी पोलिओ लस विकत घेण्यासाठी निविदा मागविल्या होत्या त्या निविदेमध्ये

महामंडळ सहभागी झाले. त्यामध्ये दोन अटी होत्या. त्यापैकी पहिली अट मागील ३ वर्षाचे प्रमाणित लेखे सादर करावे त्यातील पाचव्या व सहाव्या अटीसाठी महामंडळाने निविदा भरली होती. व दुसरी अट सरासरी उलाढाल रु.६५० कोटीची असणे आवश्यक होती. महामंडळाकडे सन २००७-२००८ चे प्रमाणित केलेले लेखे होते आणि सन २००८-२००९ व २००९-२०१० साठी तात्पुरत्या स्वरुपाचा ताळेबंद होता. महामंडळाने कंपनी नियमानुसारच सादरीकरण केले होते. त्यानुसार त्यांनी महामंडळाला पुरवठा आदेश दिले (सप्लाय ऑडर्स दिल्या) त्यांनी केवळ पाचव्या शेड्युल्डसाठी ३० मिलीयन डॉलर्सची ऑर्डर दिली, परंतु सहाव्या शेड्युल्डसाठी ३० मिलीयन डॉलर्सची ऑर्डर दिली नाही. महामंडळाने त्यावर हरकत (ऑब्जेक्शन) घेतली व केंद्रीय सार्वजनिक आरोग्यमंत्री यांना पत्र लिहिले. सदरहू पत्रामध्ये सन १९५६ च्या कंपनी अधिनियमातील कलम २१० प्रमाणे १२ महिन्यांच्या आत महामंडळ ते सादर करू शकते, त्यामुळे ताळेबंद स्वीकारण्यास काही हरकत नाही, असा उल्लेख केला. ही बाब शासनाने देखील मान्य केली. त्यांनी राईट्सला पत्र लिहिले व त्यामध्ये उल्लेख केला की, हाफकिन महामंडळाला तात्पुरता ताळेबंद देण्यास काहीही हरकत नसावी.

तथापि, राईट्सनेच महामंडळावर अन्याय केला होता. परंतु एक सरकारी कंपनी दुसऱ्या सरकारी कंपनीच्या विरोधात न्यायालयात जात असल्याची बाब योग्य होणार नाही, त्यामुळे महामंडळ न्यायालयात गेले नाही. सन २०१०-२०११ चा ताळेबंद बघितल्यास समितीला आढळून येईल की, महामंडळाचा व्यवसाय (बिझनेस) चांगला झालेला आहे. त्यामुळे ३० मिलीयन डॉलर्सची ऑर्डर न मिळाल्यामुळे महामंडळाच्या व्यवसायावर (बिझनेसवर) फारसा परिणाम झालेला नाही.

त्यानुसार वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन विभागाने औषधाच्या किंमतीचा शासन निर्णय काढणे आवश्यक होते परंतु वेळेवर शासन निर्णय निघत नव्हता. याकरिता शासनाला वेळोवेळी विनंती करण्यात आली होती. त्यामुळे महाराष्ट्र सरकारला वाजवी दरामध्ये औषधांचा पुरवठा करण्याचे उदिष्ट साध्य होणार होते. तसेच डीएचएसने महामंडळाला ऑर्डर द्याव्यात याकरिता महामंडळाचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु शासन निर्णय निघाल्यानंतरही महामंडळाला ऑर्डर्स मिळाल्या नाही तर भविष्यामध्ये महामंडळ चालविणे कठीण होणार आहे. कारण मागील चार, पाच वर्षांपासून तेथील कर्मचाऱ्यांचा पगार व इतर खर्च हाफकिन बायफार्मा कंपनीच्या शिल्लकीमधून केला जात आहे. असा महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला, त्यानुषंगाने समितीने विचारणा केली की, मधल्या काळामध्ये ॲन्टीस्नेक व्हेनम, ॲन्टी रेबीज यांची मोठ्या प्रमाणात कमतरता होती तसेच ही औषधे तातडीने द्यावी लागतात परंतु गाव पातळीवर तुटवडा निर्माण होण्याची कारणे काय आहेत. याबाबत महामंडळाच्या प्रतिनिधींनी खुलासा करतांना ॲन्टी व्हेनम्सचा शेल्फ पिरेड तीन ते साडे चार वर्षांचा असतो, शासनाकडून इतर ठिकाणाहून औषधांची खरेदी केली जात असते. एखाद्या पेशंटला ठीक करण्यासाठी पाच व्हायल्स पुरेशा आहेत. परंतु त्याच पेशंटला ठीक करण्यासाठी इतर खाजगी कंपन्यांच्या ३० ते ३५ व्हायल्स लागतात. महामंडळाच्या एका व्हायल्सची

किंमत ६०० रुपये आहे व खाजगी कंपन्यांच्या एका व्हायल्सची किंमत ४०० रुपये आहे. त्यामुळे महामंडळाच्या व्हायल्सच्या किंमती नक्कीच परवडण्यायोग्य व कमी असून ग्राहकांसाठी फायद्याचे आहे असे सांगितले.

त्यावर हाफकीनला किमान दर (लोएस्ट रेट) स्वीकारावे लागतील. हाफकीनला किंमती मध्ये अग्रक्रम देणे योग्य नाही, असा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच, पुढील तीन वर्षे हाफकीनची औषधे शासन खरेदी करेल त्यानंतर हाफकीनने स्पर्धा करावी. शासनाचे बजेट कमी असल्यामुळे सदरहू प्रकरणी अशा प्रकारचा विचार करण्यात आला आहे. हाफकीन अजिंठाला दोन-तीन वर्षे प्राथम्य देणे शक्य आहे परंतु त्यांच्या किंमती इतरांच्या तुलनेत बरोबरीच्या होत नाहीत कारण हाफकीनची किंमत इतरांच्या तुलनेत जवळपास ३० टक्के अधिक असते. हाफकीनच्या औषधांची गुणवत्ता निश्चितच चांगली आहे. या विभागीय सचिवांच्या म्हणण्यावर समितीने परंतु हाफकीनला स्पर्धेमध्ये उतरावेच लागेल असे स्पष्ट केले. त्यानुषंगाने महामंडळाच्या प्रतिनिधींने सदरहू प्रकरणी पारदर्शकता येणे आवश्यक आहे. हाफकीन शासनाच्या ऑर्डर्सवर अवलंबून राहणार नाही. खाजगी स्पर्धेमध्ये उतरण्याकरिता हाफकीनला वितरक नियुक्त करणे तसेच इतर बाबी संदर्भात शासनाकडून अनुमती घेण्यात येईल असे महामंडळाच्या प्रतिनिधींनी साक्षीच्या शेवटी नमूद केले.

६.५ अभिप्राय व शिफारस :—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी लेखा परिक्षणाच्या वेळी हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादितच्या कामकाजासंदर्भात **परिच्छेद क्र. ४.१० लेख्यांचे प्रमाणिकरण विलंबाने केल्यामुळे महसुलाचे नुकसान (वार्षिक लेख्यांचे प्रमाणिकरण न केल्यामुळे कंपनीची पोलिओ लसीच्या पुरवठ्यासाठीची निविदा अस्वीकृत केली त्यामुळे कंपनीने रु. ६.४३ कोटीचा महसूल मिळण्याची संधी गमावली)** या शिर्षकाखाली नोंदविलेल्या आक्षेपावर समितीने साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी असे निदर्शनास आले की, हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडून मुख्यत्वे पोलिओकरिता आवश्यक असलेली लस, प्रतिविष म्हणजेच अँटीस्नेक व्हेनम व गोळ्यांचे उत्पादन केले जाते या औषधांची विक्री प्रामुख्याने महाराष्ट्र शासनाला केली जाते तसेच पोलिओ लस भारत सरकारच्या व्यतिरिक्त आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका इत्यादी ४५ देशामध्ये युनिसेफ आणि पॅन अमेरिकन हेल्थ ऑर्गनायजेशनच्या माध्यमातून निर्यात केली जाते. तसेच महामंडळातर्फे ओरल पोलिओ व्हॅक्सीन ऐवजी इंजेक्टेबल पोलिओ व्हॅक्सीन पंचगुणी लस, या नवीन उत्पादनामुळे बालकांच्या प्रतिकार क्षमतेमध्ये वाढ होणार आहे. तसेच राज्यातील डॉक्टर्स व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माहितीनुसार महामंडळातर्फे रुग्णांसाठी ज्या औषधांच्या कुपीका (Vials) तयार करण्यात येतात त्याची तुलना खाजगी कंपन्याच्या कुपिकांशी केल्यास रुग्णांच्या उपचाराकरिता हाफकिनच्या ५ कुपीका (Vials) पुरेशा होतात तर खाजगी कंपनीच्या ३५ कुपीका (Vials) लागतात कारण हाफकिनच्या कुपीका (Vials) गुणकारी असतात.

औषध निर्मितीच्या व्यवसायामध्ये नफ्याचे प्रमाण अधिक असल्यामुळे तसेच औषध निर्मिती हा व्यवसाय कच्चा माल (Raw Material) आणि आवेष्टनावर (Packaging) अवलंबून असल्याने संशोधन व अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि गुणवत्ता नियंत्रण (Quality Control) या सर्व बाबींचा समतोल साधून हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित यांनी व्यापारी दृष्टीकोनातून स्पर्धात्मकरित्या औषध निर्मिती करावी अशी शिफारस समितीतर्फे करण्यात येत आहे.

हाफकिन जीव-औषध निर्माण महामंडळ मर्यादितने वार्षिक लेख्यांचे लेखापरीक्षण सन २००७-२००८ पर्यंत पूर्ण केले होते. परंतु सन २००८-२००९ व २००९-१० या वर्षांच्या उलाढालीच्या लेखापरीक्षीत झालेल्या आर्थिक लेख्यांचा आधार नसल्यामुळे व या अटीचा निविदेत उल्लेख असल्याकारणाने दुसऱ्या गटासाठी / शेड्युलसाठी ऑर्डर न मिळाल्यामुळे महामंडळाने रु. ६.३४ कोटी महसूल मिळण्याची संधी गमावली ही बाब समर्थनीय नाही कारण कंपनी ॲक्ट, १९५६ च्या कलम १६६ व २१० अंतर्गत प्रत्येक आर्थिक वर्षाच्या लेख्याला त्या आर्थिक वर्षाच्या समाप्तीपासून सहा महिन्यांच्या आत अंतिम रुप देणे महामंडळाला बंधनकारक असतानाही याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली आहे व असे प्रकार भविष्यात पुन्हा होऊ नयेत यासाठी महामंडळाने कोणती उपाययोजना केली आहे याबाबतची माहिती समितीस ३ महिन्यांच्या आत सादर करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

******

बैठकीचे परिशिष्ट

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ जून २०१५ रोजी सकाळी ११-३० वाजता, पहिला मजला, कक्ष क्रमांक १४५, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होतेः–

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(४) श्री. आकाश फुंडकर, वि.स.स.
(५) श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.
(६) श्री. राजन साळवी, वि.स.स.
(७) श्री. सुनिल राऊत, वि.स.स.
(८) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.
(९) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(१०) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(११) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(१२) ॲड. अनिल परब, वि.प.स.
(१३) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.
(१४) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.
(२) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती).

महालेखाकार कार्यालय :

(१) श्री. रविकिरण उबाळे, उप महालेखाकार
(२) श्री. एस.व्ही.खेडकर, वरिष्ठ लेखाधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) डॉ. पी. एस. मीना, अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन नागरी उड्डाण)
(२) श्री. तानाजी सत्रे, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक,
(३) श्री. चंद्रशेखर गुप्ता, महाव्यवस्थापक (तांत्रिक)

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ च्या वाणीज्यिक अहवालातील " महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित " याच्या परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होतेः–

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(४) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.
(५) ॲड. अनिल परब, वि.प.स.
(६) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.
(७) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.
(२) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)

महालेखाकार कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार
(२) श्री. एस.व्ही.खेडकर, वरिष्ठ लेखाधिकारी.

विभागीय अधिकारी :

(१) डॉ. पी. एस. मीना, अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन नागरी उड्डाण)
(२) श्री. विश्वास पाटील, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक.

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००८-२००९ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित " यांच्या परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. मनोहर भोईर, वि.स.स.
(४) ॲड. यशोमती ठाकूर, वि.स.स.
(५) श्री. बळीराम सिरसकर, वि.स.स.
(६) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव.

महालेखाकार कार्यालय, मुंबई.

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार
(२) श्री. एस.व्ही.खेडकर, वरिष्ठ लेखाधिकारी.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. अपूर्व चंद्रा, प्रधान सचिव (उद्योग)
(२) श्री. सुरेन्द्र बागडे, सचिव, लघु व मध्यम उद्योग आणि डेव्हलपमेंट कमिशनर
(३) श्री. शिवाजी दौंड, व्यवस्थापकीय संचालक, एमएसएसआयडीसी
(४) श्री. आर. डी. मडके, मुख्य फायनान्शियल ऑफिसर, एमएसएसआयडीसी लिमिटेड

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१०-२०११ व २०१३-२०१४ च्या वाणिज्यिक अहवालातील " महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ मर्यादित " यांच्या परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक १७ फेब्रुवारी २०१६ रोजी सकाळी ११-३० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होतेः–

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री.अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.
(४) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स.
(५) आर्कि. अनंत गाडगीळ, वि.प.स.
(६) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव.
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती).

महालेखाकार यांचे कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्रीमती मेधा गाडगीळ, अ.मु.स. वैद्यकीय शिक्षण
(२) श्रीमती सीमा व्यास, कार्यकारी संचालक, हाफकिन
(३) श्री. सुभाष शंकरवार, महाव्यवस्थापक, हाफकिन

समितीने भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-२०१३ च्या वाणिज्यिक अहवालातील " हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ मर्यादित " यांच्या परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांची तथा महामंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सार्वजनिक उपक्रम समितीची बैठक मंगळवार, दिनांक ५ एप्रिल २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली. सदरहू बैठकीस पुढीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते :–

उपस्थिती :

(१) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(४) डॉ. आशिष देशमुख, वि.स.स.
(५) ॲड. आकाश फुंडकर, वि.स.स.
(६) श्री. द्वारम मल्लीकार्जून रेड्डी, वि.स.स.
(७) श्री. अमित साटम, वि.स.स.
(८) श्री. राजन साळवी, वि.स.स.
(९) श्री. सुनिल राऊत, वि.स.स.
(१०) श्री. हनुमंत डोळस, वि.स.स
(११) श्री. जयवंतराव जाधव, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. प्र. स. मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

समितीने प्रारूप अहवालाच्या मसुद्यांवर विचार करून तो काही सुधारणांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई